# प्रकरण - पाच

## संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

# प्रकरण ५ वे

## संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

५.१ प्रास्ताविक

५.२ प्रतिसादक शिक्षकांची माहिती

५.३ पाठयपुस्तकांतून प्रतिबिंबित होणारी मूल्ये

५.४ पाठयपुस्तकांतील पाठांमधून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचे संक्रमण

५.५ पाठांतील मूल्यांचे संक्रमित होण्याचे प्रमाण

५.६ मूल्य संक्रमणातील अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांचे महत्व

५.७ मूल्यशिक्षणाच्या संदर्भात झालेली शिबिरे / कृतिसत्रे

५.८ मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन

५.९ प्रस्तुत संशोधनासंबंधी अन्य उपयुक्त माहिती

५.१० समारोप

=0=0=0=0=0=

# प्रकरण ५ वे

## संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

### ५·१ प्रास्ताविक :

मागील प्रकरणांचा उपयोग हया प्रकरणाची पार्श्वभूमी तयार करण्यासाठी असून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण आणि अर्थ निर्वचन करुन त्याचा अन्वयार्थ लावणे हे प्रस्तुत प्रकरणाचे उद्दिष्ट आहे·


अभ्यासकाने कोल्हापूर शहरातील महानगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक शाळांमध्ये १ ते ४ इयत्तांना शिकविणा-या शिक्षकांसाठी मातृभाषेच्या पाठय - पुस्तकांतील पाठांमधील मूल्यांच्या संदर्भात एक प्रश्नावली तयार केली· (परिशिष्ट "अ" पहा) या प्रश्नावलीची माहिती पहिल्या प्रकरणात दिली आहे· (पहा पृष्ठांक ७६ ) एकूण ४५ शाळांतील १८० शिक्षकांना प्रश्नावल्या दिल्या होत्या· त्यापैकी १०६ शिक्षकांनी प्रश्नावल्या भरुन परत दिल्या ( परिशिष्ट "ब" पहा )·

### ५·२ प्रतिसादक शिक्षकांची माहिती :

प्रश्नावलीतील पहिला भाग हा प्रतिसादक शिक्षकांच्या माहितीच्या संदर्भात होता· त्यामध्ये शिक्षकांचे पूर्ण नांव ( प्रश्न क्रमांक १ ), शैक्षणिक पात्रता (प्रश्न क्रमांक २), शाळेचे नांव व पत्ता ( प्रश्न क्रमांक ३ ), अध्यापनाचा एकूण अनुभव (प्रश्न क्रमांक ४), मराठी विषय शिकवण्याचा अनुभव (प्रश्न क्रमांक ५), हे प्रश्न प्रतिसादक शिक्षकांची व्यक्तिगत माहिती दर्शवितात·

खालील सारणी ( सारणी क्रमांक ५·१ ) मध्ये शिक्षकांकडून भरुन आलेल्या प्रश्नावलीच्या आधारे शिक्षकांची शैक्षणिक पात्रता दाखविली आहे·

शिक्षकांची शैक्षणिक पात्रता १ सें.मी = 3 शिक्षक संख्या.



## सारणी क्रमांक ५•१

### प्रतिसाद देणा-या शिक्षकांची शैक्षणिक पात्रता

| अ•नं• | शैक्षणिक पात्रता | शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १• | बी•ए•डी•एड्• | १४ | १३•२१% |
| २• | एस्•एस्•सी• डी•एड्• | ५९ | ५५•६६% |
| ३• | सिनियर ट्रेंड | २० | १८•८७% |
| ४• | ज्युनिअर ट्रेंड | ७ | ६•६०% |
| ५• | अनट्रेंड/पी•एस•सी• | ६ | ५•६६% |
| | एकूण •• | १०६ | १०० % |

वरील सारणीचा विचार करता १००% शिक्षक हे शैक्षणिक दृष्टया प्राथमिक स्तरावर अध्यापन करण्यास पात्र आहेत• फक्त ६ शिक्षक हे अप्रशिक्षित व पी•एस्•सी• परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत• परंतु त्यांचा शैक्षणिक अनुभव १० वर्षापेक्षाही अधिक आहे• त्यांचा हा दीर्घ अध्यापन अनुभव शैक्षणिक पात्रता यामुळे संबंधित शिक्षक हे प्राथमिक स्तरावर अध्यापन करण्यास पात्र समजण्यास हरकत नसावी• त्यामुळे मिळालेल्या शैक्षणिक पात्रते संबंधीचा प्रतिसाद ग्राहय मानावयास हरकत नाही•

पुढील सारणी ( सारणी क्रमांक ५•२ ) मध्ये प्रतिसादक शिक्षकांचा शैक्षणिक अनुभव दिलेला आहे•

## सारणी क्रमांक ५·२

### शिक्षकांचा शैक्षणिक अनुभव

| अ·नं· | अनुभव वर्षे | प्रतिसादक संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १· | ० ते ५ वर्षे | ८ | ७·५५ % |
| २· | ६ ते १० वर्षे | १३ | १२·२६% |
| ३· | ११ ते १५ वर्षे | २१ | १९·८१% |
| ४· | १६ ते २० वर्षे | ३२ | ३०·१९% |
| ५· | २१ ते २५ वर्षे | १३ | १२·२६% |
| ६· | २६ ते ३० वर्षे | ८ | ७·५५% |
| ७· | ३१ ते ३५ वर्षे | ९ | ८·४९% |
| ८· | ३६ ते ४० वर्षे | २ | १·८९% |
| | एकूण ·· | १०६ | १०० % |

वरील सारणी वरून शिक्षकांच्या अनुभवाचे अ मध्यमान काढले असता ते १७·६७ वर्षे इतके येते· त्यांचा हा अनुभव कोणत्याही मापदंडाने मोजला तरी दीर्घ आहे· असे म्हणावयास हरकत नाही· त्यामुळे एवढा दीर्घ अनुभव असलेल्या शिक्षकांची मते ग्राह्य धरावयास हरकत नाही·

प्रश्नावलीमधील प्रश्न क्रमांक ५ मराठी विषय शिकविण्याच्या अनुभवासंबंधी होता· या पश्नास दिलेल्या प्रतिसादावरून प्रतिसादकाने जितके वर्षे अध्यपन केले ती सर्व वर्षे मराठी विषयाचे अध्यापन केले आहे असे आढळून आले· त्यामुळे प्रतिसादकाचा एकूण अनुभव व मराठी विषय शिकविण्याचा अनुभव सारखाच असून त्याचेही मध्यमान १७·६७ वर्षे इतके आहे·

आकृती क्रमांक ५.३


## मूल्यांचे संक्रमणाविषयी अध्यापकांचे मत

प्रमाण २५९°:१०१°

— सूची —

← 'होय' म्हणणारे,

• 'नाही' म्हणणारे.



### ५·३ पाठयपुस्तकांतून प्रतिबिंबित होणारी मूल्ये :

प्राथमिक स्तरावर काम करणा-या शिक्षकांना प्रश्नावली सोबत इयत्ता १ ते ४ च्या मराठीच्या पाठयपुस्तकांतील पाठांमधून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांची यादी पुरविलेली होती व या मूल्यांखेरीज आणखी कांही मूल्ये सदर पाठांमधून प्रतिबिंबित होत असतील तर त्याची नोंद संबंधित पाठांसमोर करण्यास सांगीतले होते ( प्रश्न क्रमांक ६ )· त्या प्रमाणे त्यांनी सुचविलेल्या मूल्यांची यादी (परिशिष्ट क्रमांक "ड" ते "ख" मध्ये) दिलेली आहे·

### ५·४ पाठयपुस्तकांतील पाठांमधून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचे संक्रमण :

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ७ मराठीच्या पाठयपुस्तकांचे अध्यापन करतांना पाठांमधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जातात काय ? हा बंदिस्त स्वरूपाचा प्रश्न होता· प्रश्नाला दिलेल्या होय / नाही या दोन पर्याया पैकी लागू पडणा-या पर्यायासमोर बरोबर(✓) अशी खूण करावयास सांगीतले होते· प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसाद पुढील सारणी मध्ये ( सारणी क्रमांक ५·३ ) नमूद केला आहे·

सारणी क्रमांक ५·३

पाठयपुस्तकांतील मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण करण्यासंबंधी अध्यापकांचे मत

| अ·नं· | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १· | होय | ७४ | ६९·८१ % |
| २· | नाही | ३२ | ३०·१९ % |
| | एकूण ·· | १०६ | १०० % |

वरील सारणी ( सारणी क्रमांक ५•३ ) वरुन असे अनुमान काढता येते की, मराठीच्या पाठ्यपुस्तकाने अध्यापन करत असताना विद्यार्थ्यांमध्ये जाणीवपूर्वक मूल्ये संक्रमित केली जातात असे १०६ प्रतिसादकांपैकी ७४ प्रतिसादकांचे ( ६९•८१% ) म्हणणे आहे• विद्यार्थ्यांत ही मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जात नाहीत असे १०६ पैकी ३२ प्रतिसादकांचे ( ३०•१९% ) म्हणणे आहे•

यावरुन असा निष्कर्ष काढता येतो की, बहुसंख्य शिक्षकांच्या (६९•८१%) मते प्राथमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकांतील पाठांमधून प्रतिबिंबित झालेली मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये जाणीवपूर्वक संक्रमित करण्याचा प्रयत्न केला जातो•

पाठ्यपुस्तकांतील पाठांमधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जातात असे प्रतिपादन करणाऱ्या अध्यापकांसाठी प्रश्न क्रमांक ८ विचारला होता• या प्रश्नाद्वारे ही मूल्ये कशाप्रकारे संक्रमित केली जातात यासंबंधी विचारणा केली होती• या बाबत प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादांमधून समान प्रतिसाद एकच करुन मूल्ये संक्रमित करण्याचे मार्ग आणि त्याची वारंवारिता पुढील सारणी मध्ये ( सारणी क्रमांक ५•४ ) नोंदलेली आहे•

सारणी क्रमांक ५•४

मूल्ये संक्रमित करण्याचे मार्ग

( प्रतिसादाच्या उतरत्या श्रेणीनुसार)

| अ•नं• | प्रतिसादकाकडून मिळालेले प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १• | मूल्यांवर आधारित पौराणिक, ऐतिहासिक, व्यवहारातील कथा, उदाहरणे व दाखले, संत, आदर्श पुरुष इत्यादींच्या जीवनातील प्रसंग. इत्यादी विद्यार्थ्यांना सांगून मूल्य संक्रमण करणे• | २४ | ३२•४३% |

सारणी क्रमांक ५·४ पुढे चालू ····

| अ·नं· | प्रतिसादकाकडून मिळालेले प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
| --- | --- | --- | --- |
| २· | पाठांचे अध्यापन करताना मूल्ये संक्रमित व्हावीत या उद्देशाने जाणीवपूर्वक प्रभावी अध्यापन करणे· | १७ | २२·९७% |
| ३· | राष्ट्रीय सण, थोरपुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या विविध त-हेचे अभ्यासपूरक व अभ्यासेतर कार्यक्रमांची योजना करुन त्यात विद्यार्थ्यांना सहभागी करणे· | १६ | २१·६२% |
| ४· | आदर्श व गौरवास्पद वर्तन केलेल्या व्यक्तींचा, विद्यार्थ्यांचा शाळेत सत्कार समारंभ करणे, समाजातील अशा घटना, प्रसंग विद्यार्थ्यांना सांगणे· | ९ | १२·१६% |
| ५· | शिक्षकांचे वर्तन, त्यांचे आचरण याद्वारे | ३ | ४·०६% |
| ६· | पाठाचा सार कथारुपाने सांगून मूल्यांचे जीवनातील महत्व व गरज कथन करणे· | ३ | ४·०६% |
| ७· | पाठातील चित्रांवर चर्चाकरुन दृक्-श्राव्य साधनांच्या द्वारे मूल्ये ठसविण्यास मदत होते· | २ | २·७०% |
| | एकूण ·· | ७४ | १०० % |

वरील सारणीतील अनुक्रमांक १ मूल्यावरुन आधारित असे पुराणातील, इतिहासातील, व्यवहारातील, कथा, लोककथा, सांस्कृतिक व पारंपरिक कथा, विविध उदाहरणे, दाखले इत्यादी विद्यार्थ्यांना सांगून त्या द्वारे विद्यार्थ्यांवर मूल्य संस्कार करता येतो व मूल्ये संक्रमित करता येतात असे ७४ पैकी २४ प्रतिसादकांचे म्हणणे (३२·४३%) आहे· याचाच अर्थ सारणीतील अनुक्रमांक १ हा मार्ग मूल्ये

संक्रमित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापरला जातो·

प्रतिसादकांचे हे म्हणणे पटण्यासारखे आहे· कारण इतिहास, पुराण, साहित्य यातील दाखले उदाहरणे किंवा कथा आपण ज्यावेळी सांगतो किंवा देतो तेंव्हा त्याद्वारे मूल्यांना आदर्श मानून जीवन व्यतीत केलेल्या व्यक्तींची, त्यातील सत्- असत् ची ओळख करुन देत असतो· त्यामुळे प्रत्यक्ष मूल्यांचा स्वीकार केलेली ही व्यक्तिमत्वे आपण विद्यार्थ्यांसमोर उभी करत असतो· अशा प्रभावी आदर्श व्यक्तिमत्वाचा प्रभाव पडल्याने अशी व्यक्तिमत्वे विद्यार्थ्यांना अनुकरणीय वाटतात व अशा व्यक्तींनी स्विकृत केलेली मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये सहजतेने संक्रमित होतात·

मूल्य ही संकल्पना अमूर्त आहे व मूल्यांची स्वीकृती ही व्यक्तीच्या वर्तनातच पहावी लागते· त्यामुळे एखाद्या व्यक्तीच्या ठायी मूल्यांची स्वीकृती झाली आहे किंवा नाही हे त्या व्यक्तींच्या वर्तनाच्या निरीक्षणातून आपण ठरवू शकतो· म्हणजेच अमूर्त मूल्ये ही मूर्त स्वरुपात आपण व्यक्तीच्या वर्तनातच तिच्या जीवन व्यवहारातच पाहू शकतो· त्यामुळे पुराण, इतिहास, सांस्कृतिक दाखले, लोककथा, व्यवहार या सर्वांमधील उदाहरणे, दाखले , प्रसंग या द्वारेच या मूल्यांचे मूर्त रुपात विद्यार्थ्यांना दर्शन घडते· त्यामुळे अशी मूल्ये विद्यार्थ्यांत संक्रमित होण्यात सुलभता येते·

सारणीतील अनुक्रमांक २ मध्ये पाठाचे अध्यापन करतांना मूल्ये संक्रमित व्हावीत या उद्देशाने जाणीवपूर्वक प्रभावी अध्यापन करावे असे मत ७४ प्रतिसादकापैकी १७ प्रतिसादकांनी ( २२·९७%) नमूद केले आहे· याचाच अर्थ सारणीतील अनुक्रमांक दोन हा मार्ग मूल्य संक्रमित करण्यासाठी ब-याच प्रमाणात वापरला जातो·

प्रतिसादकांचे हे म्हणणेही पटण्यासारखे आहे· कारण मूल्य संक्रमित करणे म्हणजेच विद्यार्थ्यांवर त्या मूल्यांच्या स्वीकृतीसाठी इष्ठ असे संस्कार करणे होय· हे संस्कार करण्याचे प्रभावी साधन म्हणजे अध्यापन होय· शाळेत येणारा

विद्यार्थी हा विविध त-हेच्या सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक वातावरणातून येत असतो. त्याच्यावर झालेले संस्कार विविध त-हेचे इष्ट, अनिष्ठ असे असतात अशा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये मूल्ये संक्रमित करण्यासाठी मूल्यांना अनुसरुन वातावरण निर्माण करणे, मूल्य संक्रमनाच्या दृष्टीने योग्य अशी त्याची मनोभूमिका तयार करणे, मूल्य संक्रमण व त्याचा स्वीकार या दृष्टीने योग्य वातावरण निर्माण करणे आवश्यक असते. हे सर्व प्रभावी व जाणीवपूर्वक केलेल्या अध्यापना-द्वारेच निर्माण केले जाऊ शकते. असे अध्यापन करणारा शिक्षकच विद्यार्थ्यांवर सुयोग्य संस्कार करु शकतो. म्हणून मूल्य संक्रमण करण्यासाठी हा ही मार्ग अत्यंत महत्वाचा आहे असे म्हटले पाहिजे.

सारणीतील अनुक्रमांक ३ मध्ये राष्ट्रीयसण, थोर पुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या, विविध त-हेचे अभ्यासपूरक व अभ्यासेतर कार्यक्रमांची योजना करुन त्यात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे याद्वारेही मूल्यांचे संक्रमण करता येते असे मत ७४ पैकी १६ प्रतिसादकांनी ( २१.६२%) नोंदविलेले आहे.

शिक्षणाद्वारे व्यक्तीचे व्यक्तिमत्व घडविले जाते. यासाठी शिक्षणाद्वारे व्यक्तीवर केले जाणारे संस्कार जाणीवपूर्वक केले जातात. व्यक्तिमत्व घडणीचे हे कार्य तसेच त्याचा सर्वांगिण विकास करण्याचे कार्य केवळ विहित अभ्यासक्रम शिकवून पूर्ण होत नाही. तर त्याच्या जोडीला अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविणे आवश्यक असते. त्याद्वारे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास साधला जातो, व्यक्तिमत्व घडविले जाते. त्यामुळे अभ्यासक्रमाइतकेच या अभ्यासपूरक व अभ्यासेतर कार्यक्रमांना शालेय जगतात महत्वाचे स्थान आहे. या कार्यक्रमातून व्यक्तीचे अपेक्षित असे सुयोग्य, आदर्श, संपन्न व्यक्तिमत्व निर्माण करण्यासाठी या कार्यक्रमाची जाणीवपूर्वक योजना केल्याने आपणास अपेक्षित असे व्यक्तिमत्व निर्माण करता येते. यासाठी व्यक्तीवर जाणीवपूर्वक संस्कार करणे आवश्यक आहे. वरील सारणीतील अनुक्रमांक ३ समोरील प्रतिसादकांच्या मता-नुसार अभ्यासपूरक व अभ्यासेतर कार्यक्रमच योजतात. कोणते अभ्यासपूरक कार्यक्रम,

उपक्रम ते योजतात यासंबंधी आणखी तपशील प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १३,१४ व १५ या प्रश्नांचे विश्लेषण करतांना मिळेल.

सारणीतील अनुक्रमांक ४ मध्ये आदर्श वर्तन करणा-या व्यक्ती, विद्यार्थी यांचा शाळेत सत्कार करणे व समाजातील असे प्रसंग घटना विद्यार्थ्यांना सांगणे या द्वारे मूल्यांचे संक्रमण करता येते असे मत ७४ पैकी ९ प्रतिसादकांनी (१२.१६%) नमूद केलेले आहे.

वरील अनुक्रमांक ३ मध्ये विद्यार्थ्यांना मूल्यस्वीकृतीचे प्रत्यक्ष पुरावे दिल्याने व समाजातील रोजच्या जीवनातील घटना प्रसंगातून हे मिळाल्यामुळे मूल्यांचे संक्रमण हे प्रभावी व परिणामकारकपणे होण्याची शक्यता आहे. म्हणून मूल्य संक्रमणाच्या दृष्टीने हाही मार्ग महत्वाचा आहे असे नमूद करावेसे वाटते.

सारणीतील अनुक्रमांक ५ मध्ये शिक्षकांचे वर्तन त्यांचे आचरण याद्वारे मूल्यांचे संक्रमण होते असे मत ७४ पैकी ३ प्रतिसादकांनी ( ४.०६% ) नोंदविलेले आहे.

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी हे शिक्षकांचे सूक्ष्म निरीक्षण करता असतात. त्यांचे वागणे, बोलणे, राहणे या सर्वांचे ते अनुकरण करत असतात. त्यांच्यासमोर आपले शिक्षक हाच मुख्य आदर्श असतो. त्यामुळे असा आदर्शच जर मूल्यांनी युक्त असेल, त्याच्या वर्तनातून मूल्यांचे प्रतिबिंब दिसत असेल तर साहजिकच आपोआप मुले शिक्षकांप्रमाणे आचरण करतात. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या वयोगटा-चा विचार केला असता हे नोंदविलेले मत अत्यंत महत्वाचे आहे. पण प्रतिसादकांचा यासाठी मिळालेला प्रतिसाद अत्यंत अल्प आहे ही खेदाची बाब म्हणावी लागेल.

सारणीतील अनुक्रमांक ६ मध्ये पाठाचा सारांश कथारुपाने सांगून मूल्यांचे मानवी जीवनातील महत्व व गरज कथन करणे याद्वारे मूल्य संक्रमण करता येत असे ७४ पैकी ३ प्रतिसादकांनी ( ४.०६% ) नमूद केले आहे.

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये मूल्य संक्रमण करतांना वरील त-हेने

मुलांचे महत्वाच्या गोष्टींकडे लक्ष वेधता येते. हितोपदेश , पंचतंत्र, इसापनिती या पुस्तकातील कथांमध्ये ही पध्दती अनुसरलेली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष कथेच्या उद्देशाकडे वेधता येऊन तो उद्देश त्यांच्या मनावर ठसविण्यास सुलभ पडते.

सारणीतील अनुक्रमांक ७ मध्ये पाठातील चित्रावर चर्चाकरुन दृक्-श्राव्य साधनांच्याद्वारे मूल्य ठसविता येते. म्हणजेच याद्वारे मूल्य संक्रमण करता येते असे मत ७४ पैकी २ प्रतिसादकांनी ( २.७०% ) नमूद केले आहे.

पाठातील चित्रे, दृक्श्राव्य साधने यांच्या मुळे अध्यापन प्रभावी बनते. भाग, आशय चटकन समजतो. या साधनामुळे प्रसंग घटना अधिक भावपूर्ण व परिणामकारक बनतात. त्यामुळे याद्वारे मूल्य संक्रमनात सुलभता येऊ शकेल.

मूल्ये संक्रमित करत नाहीत असे ज्यांनी उत्तर दिले आहे त्यांच्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्नक्रमांक ९ ची योजना केली होती. पाठांतून प्रतिबिंबित झालेली मूल्ये विद्यार्थ्यांत जाणीवपूर्वक संक्रमित केली जात नाहीत असे प्रतिसाद देणा-या अध्यापकांकडून मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित का केली जात नाहीत ? हे जाणून घेण्यासाठी या प्रश्नाची योजना केली होती. हा प्रश्न बंदीस्त व मुक्त असा संमिश्र स्वरुपाचा होता. या प्रश्नाच्या पूर्वार्धात चार कारणे दिलेली होती. त्यातील सहमत असलेल्या कारणापुढे बरोबर (✓) अशी होकारात्मक खूण करण्यास सांगीतली होती. अध्यापकांनी कारणांना दिलेला प्रतिसाद पुढील सारणीत (सारणी क्रमांक ५.५) मांडलेला आहे.

सारणी क्रमांक ५.५

मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जातनसल्याची कारणे

| अ.नं. | कारणे | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक प्रमाण(शेकडा) |
|---|---|---|---|
| १. | परीक्षा पध्दतीत मूल्यांवर प्रश्न नाही. | १४ | ४३.७५% |

सारणी क्रमांक ५·५ पुढे चालू ····

| अ·नं· | कारणे | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| २· | मूल्ये शिकवण्यावर भर दिल्यास अभ्यासक्रम पूर्ण होणार नाही· | १२ | ३७·५०% |
| ३· | मूल्य संक्रमित करणे हे शिक्षणाचे उद्दीष्ट नव्हे | २ | ६·२५% |
| ४· | दैनंदिन व्यवहारात मूल्यांचा उपयोग होत नाही· | ४ | १२·५०% |
| | एकूण ·· | ३२ | १०० % |

एकूण १०६ प्रतिसादकांनी प्रश्नावल्या भरुन दिल्या· त्यापैकी ३२ प्रतिसादकांनी प्रश्नक्रमांक ९ ला प्रतिसाद दिलेला आहे· हे प्रमाण शेकडा ३० इतके आहे·

सारणी क्रमांक ५·५ मधील अनुक्रमांक १ मध्ये परीक्षा पध्दतीत मूल्यांवर प्रश्न नाही त्यामुळे अध्यापन नाही या कारणास ३२ पैकी १४ प्रतिसादकांनी प्रतिसाद दिलेला आहे· हे प्रमाण ४३·७५% आहे· प्रश्नावली भरुन देणा-या एकूण १०६ प्रतिसादकांच्या बाबतीत विचार केल्यास हे प्रमाण १३·२१ % आहे·

वरील सारणी क्रमांक ५·५ मधील अनुक्रमांक १ परीक्षा पध्दतीत मूल्यांवर प्रश्न नाही त्यामुळे अध्यापन नाही· हा दिलेला प्रतिसाद पाहता हे प्रतिसादकाचे म्हणणे मान्य करावे लागते· परंतु मूल्य या संकल्पनेचे स्वरुप आणि आजच्या परीक्षेचे स्वरुप याचा विचार केला असता आजच्या परीक्षा पध्दतीत मूल्यांवर आधारित प्रश्न आपणास विचारता येतील कां ? आणि विचारता आल्यास मूल्य संक्रमणाच्या संदर्भात यथार्थ मूल्यमापन करता येईल का ? याबाबत अनिश्चितता आहे· तसेच प्रश्नाची योग्य व समर्पक उत्तरे देणारा विद्यार्थी हा मूल्य धारण

केलेला असेलच असे नाही· त्यामुळे मूल्य हा संबोध केवळ परीक्षे पुरताच मर्यादित ठेवणे इष्ट नाही·

सारणी क्रमांक ५·५ मधील अनुक्रमांक २ मध्ये मूल्य शिकवण्यावर भर दिल्यास अभ्यासक्रम पूर्ण होणार नाही· त्यामुळे जाणीवपूर्वक मूल्य संक्रमण केले जात नाही· असे मत ३२ पैकी १२ प्रतिसादकांनी ( ३७·५०% ) मांडलेले आहे· एकूण १०६ प्रतिसादकांच्या बाबतीत विचार केल्यास हे प्रमाण शेकडा ११·३२% पडते·

प्रतिसादकाचे मते अभ्यासक्रम संपला की आपला कार्यभाग संपला अशी शिक्षकांची भूमिका बनत चालल्याची लक्षणे सध्याच्या शिक्षणपध्दतीत पहावयास मिळतात· परंतु मूल्य शिक्षणाकडे लक्ष दिल्यास अभ्यासक्रम पूर्ण होणार नाही असा प्रतिसादकांचा समज आहे· मूल्य शिक्षणाकडे लक्ष द्यावयाचे म्हणजे स्वतंत्र तास द्यावयाचा किंवा खास जादा वेळ द्यावयाचा असा शिक्षकांचा समज असेल तर तो बरोबर आहे असे वाटत नाही· कारण शिकवता शिकवतानाच त्यात आलेली मूल्ये आणि त्यांचे महत्व समजावून द्यावयाचे आहे हे अगदी सहजपणे करावयाचे असून त्यासाठी खास असा अधिक वेळ द्यावयाचा नाही· अभ्यासक्रम पूर्ण करणे हा शिक्षकांचा समज झाला आहे· तोही बरोबर नाही· अभ्यासक्रम हे एक साधन आहे, साध्य नव्हे, साधनावर लक्ष केंद्रित करुन साध्याकडे (मूल्यरुजवण्याकडे) दुर्लक्ष करणे शैक्षणिक दृष्टया उचित होईल असे वाटत नाही·

अनुक्रमांक ३ मध्ये "मूल्य संक्रमित करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट नव्हे" या कारणासाठी ३२ पैकी २ प्रतिसादकांनी ( ६·२५% ) प्रतिसाद दिलेला आहे· एकूण १०६ प्रतिसादकांच्या बाबतीत विचार केल्यास हे प्रमाण शेकडा १·८९ पेक्षा ही कमी पडते· शिक्षण म्हणजे सुसंस्कार, शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यामध्ये घडवून आणलेले इष्ट ते परिवर्तन या शिक्षणाच्या सर्वमान्य व्याख्या प्रमाणभूत मानल्यास मूल्य संक्रमण करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट नव्हे असे कारण सांगणा-या अध्यापकांना शिक्षणाची मूळ उद्दिष्टेच समजली नाहीत असे म्हणणे प्राप्त आहे· सुदैवाने मते प्रतिपादन करणा-या शिक्षकांची संख्या शेकडा १·८९ म्हणजे नगण्य आहे·

अनुक्रमांक ४ मध्ये दैनिंदिन व्यवहारात मूल्यांचा उपयोग होत नाही असे कारण दिलेले आहे. यास ३२ पैकी ४ प्रतिसादकांनी (१२.५०%) प्रतिसाद दिलेला आहे. प्रश्नावली [redacted] भरुन देणा-या एकूण १०६ प्रतिसादकांच्या बाबतीत विचार केल्यास हे प्रमाण ३.७७% इतके आहे.

जीवन आणि शिक्षण यांची फारकत करता येत नाही. तसेच मूल्ये ही जीवनातप्रतिबिंबित होत असतात व त्यांचा स्वीकार व्यक्ती शिक्षणाद्वारे करत असते. आजच्या भ्रष्टाचारी, लाचलुचपत आणि वशिलेबाजी यांनी बरबटलेल्या सामाजिक जीवनातील दैनंदिन व्यवहारात मूल्यांच्या उपयोग होत नाही. असे म्हणणे खरेही असेल. तथापि वैयक्तिक आणि सामाजिक स्वास्थ व केवळ आर्थिक उत्कर्षच नव्हे तर सांस्कृतिक उत्कर्षाच्या दृष्टीने विचार केला तर मूल्ये मानणारी आणि त्यांची [redacted] प्राणपणाने निष्ठापूर्वक जोपासना करणारी माणसे कोणत्याही समाजात सर्वकाळ हवी असतात, आणि म्हणूनच आजच्या दैनंदिन व्यवहारात मूल्यांचा उपयोग होत नाही. म्हणून ती जाणीवपूर्वक संक्रमित न करण्यापेक्षा ते एक आव्हान समजून संक्रमित करणे आवश्यक आहे असे नमूद करावेसे वाटते.

जाणीवपूर्वक मूल्ये संक्रमित केली जात नसल्यास प्रश्नावली मध्ये नमूद केलेल्या कारणा व्यतिरिक्त अन्य कारणे कोणती आहेत हे जाणून घेण्याच्या उद्देशाने याच प्रश्नाच्या उत्तरार्धात मुक्त प्रश्नांची योजना करण्यात आलेली होती. प्रतिसादकांनी दिलेले समान प्रतिसाद एकत्र करुन खालील सारणी क्रमांक ५.६ मध्ये कारणांची विधाने नोंदवलेली आहेत व त्यांच्यापुढे प्रतिसादकांच्या संख्येची नोंद केलेली आहे.

## सारणी क्रमांक ५•६

### मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जात नाहीत त्याची अन्य कारणे

| अ•क्र• | प्रतिसादकांनी सुचवलेली अन्य कारणे | प्रतिसादकांचा प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १• | मूल्य अध्यापनाच्या संदर्भात प्रशिक्षण, मार्गदर्शन यांचा अभाव, निश्चित अध्यापन पध्दती नाही, मूल्य शिक्षणाच्या संदर्भात शिबिर अथवा कृतिसत्र प्राथमिक स्तरावर घेतले जात नाही त्यामुळे मूल्य संक्रमनाकडे दुर्लक्ष. | १२ | ३७•५०% |
| २• | समाजामध्ये मूल्यांच्या बाबत असलेली उदासिन-वृत्ती व मूल्यांचा ऱ्हास होतांना दिसतो• त्यामुळे मूल्यावरील विश्वास उडतो• | ६ | १८•७५% |
| ३• | एकाच शिक्षकास सर्व विषयाचे अध्यापन करावे लागते• त्यामुळे मूल्य शिक्षणाकडे दुर्लक्ष होते• | ४ | १२•५०% |
| ४• | विद्यार्थी संख्या भरमसाठ त्यामुळे मूल्य संक्रमणाकडे दुर्लक्ष होते• | ४ | १२•५०% |
| ५• | चित्रपट, दूरदर्शन, जाहिरातबाजी यांचा बालमनावर अनिष्ठ परिणाम यामुळे मूल्य संक्रमन प्रभावी नाही• | २ | ६•२५% |
| | एकूण •• | ३८ | |

वरील सारणी क्रमांक ५·६ मधील अनुक्रमांक १ मध्ये मूल्य अध्यापनाच्या संदर्भात शिक्षकांना प्रशिक्षण मार्गदर्शन यांचा अभाव, निश्चित पध्दती नाही· तसेच या संदर्भात मूल्य शिक्षण शिबीर, कृतिसत्र अथवा सेवांतर्गत प्रशिक्षणाचा अभाव त्यामुळे मूल्य संक्रमणाकडे दुर्लक्ष होते असे मत ३२ पैकी १२ प्रतिसादकांनी (३७·५०%) नमूद केले आहे· प्रतिसादकांचे हे मत पटते· कारण कोणत्याही प्रशिक्षण महाविद्यालयातून मूल्य शिक्षण संदर्भात निश्चित दिशा, मार्गदर्शन नाही तसेच मूल्य शिक्षणाच्या संदर्भात निश्चित अशा अध्यापन पध्दतीचा अभाव त्यामुळे केवळ दैनंदिन अध्यापनाच्या द्वारेच मूल्य संक्रमणाचे कार्य केले जाते· यात केवळ सहजगत्या मूल्य शिक्षण घडावे हाच दृष्टिकोन दिसून येतो· यासाठी खास असे जाणीवपूर्वक प्रयत्न आढळत नाहीत· तसेच प्राथमिक स्तरावर अध्यापनाचे कार्य करणा-या शिक्षकांसाठी मूल्य शिक्षणाच्या संदर्भात शिबीर, कृतिसत्र घेतले जात नाही अथवा सेवांतर्गत प्रशिक्षणही घेतले जात नाही असे आढळून येते· त्यामुळे प्रतिसादकाने मूल्य संक्रमणाच्या संदर्भात सुचविलेले वरील कारण योग्य वाटते·

सारणी क्रमांक ५·६ मधील अनुक्रमांक २ मध्ये समाजामध्ये मूल्यांच्या बाबतीत उदासीनवृत्ती दिसते व मूल्यांचा -हास होतांना दिसतो· त्यामुळे मूल्यांवरील विश्वास उडतो· त्यामुळे विद्यार्थ्यांत मूल्ये जाणीवपूर्वक संक्रमित केली जात नाहीत असे मत ३२ प्रतिसादकापैकी ६ प्रतिसादकांनी (१८·७५%) नमूद केले आहे·

समाजामध्ये मूल्यांचा -हास होतांना दिसतो· त्यामुळे मूल्यांवरील विश्वास उडतो हे प्रतिसादकांचे म्हणणे निश्चित पटावे, व्यसनाधिनता, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, अनैतिकता, लाचलुचपत या गोष्टींना समाजात प्रतिष्ठा मिळत असल्याचे दिसते· याची स्पष्ट कबुली " शैक्षणिक आव्हान - एक धोरणात्मक यथार्थदर्शन " या पुस्तिकेमध्ये " समाजातील सर्वच क्षेत्रातील विचारवंत मूल्यांचा वाढता -हास व त्याचा परिणाम म्हणून दूषित समाजजीवन पाहून चिंतित झाले आहेत·" या शब्दात केंद्रीय शासनाने दिलेली आहे· असे मूल्य विरहित जीवन प्रतिष्ठेचे बनत चालले आहे· त्यामुळे मूल्य शिक्षणाबाबत उदासीन वृत्ती वाढलेली

आहे. मूल्यावरील विश्वास उडालेला आहे. त्यामुळे अशा प्रतिष्ठेतील खोटेपणा दाखविणे गरजेचे आहे. या दृष्टीने शिक्षण हे व्यक्तिमध्ये अपेक्षित बदल करण्याचे महत्वाचे साधन असल्यामुळे शिक्षणाच्या साहाय्यानेच ही खोटी प्रतिष्ठा स्पष्ट करता येईल व शिक्षणाद्वारे आपणास समाजातील मूल्यांचा होत असलेला -हास थांबविता येईल. यासाठी समाजाच्या भावी पिढीवर जाणीवपूर्वक मूल्य संस्कार करणे आवश्यक आहे. हे मूल्य संस्कार व संक्रमणाचे कार्य शिक्षकांनाच करावयाचे आहे व त्यातूनच ख-या अर्थाने समाजात मूल्यांना योग्य स्थान प्राप्त झाल्याचे दिसून येऊ शकेल.

अनुक्रमांक ३ मध्ये एकाच शिक्षकास सर्व विषयाचे अध्यापन करावे लागते. त्यामुळे मूल्य शिक्षणाकडे दुर्लक्ष होते असे मत ३२ पैकी ४ प्रतिसादकांनी (१२.५०%) नमूद केलेले आहे.

प्राथमिक स्तरावर एकच शिक्षक सर्व विषयाचे अध्यापन करतात त्यामुळे मूल्य शिक्षणाकडे दुर्लक्ष होते असे म्हटले आहे. परंतु मूल्य शिक्षण म्हणजे स्वतंत्रपणे शिकवण्याचा विषय नव्हे तर विद्यार्थ्यांची विशिष्ट अशी मनोभूमिका तयार करणे, त्यांच्या विचारशक्तीस योग्य वळण लावणे होय. त्यामुळे ही मनोभूमिका शिक्षक कोणताही विषय शिकवत असताना तयार करु शकतो. यासाठी खास स्वतंत्र असे अध्यापन करावे लागत नाही. संबंधीत विषय घटकाद्वारेच मूल्य संक्रमित करण्याचे कार्य करावयाचे असल्याने प्रतिसादकांनी वरील सुचविलेले कारण संयुक्तिक वाटत नाही.

अनुक्रमांक ४ मध्ये वाढती विद्यार्थी संख्या या मुळे मूल्य संक्रमण होत नाही. असे प्रतिपादन ३२ पैकी ४ प्रतिसादकांनी ( १२.५०% ) केलेले आहे.

आजच्या परिस्थितीमध्ये प्रत्येक वर्गात सर्वसाधारणपणे ५० ते ६० विद्यार्थी संख्या पहावयास मिळते. कधी कधी याही संख्येपेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असते. त्यामुळे एकच शिक्षक सर्व विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष पुरवू शकत नाही. शिवाय एकच शिक्षक दोन दोन वर्ग हाताळतांना दिसतो. त्यामुळे धड तो कोणत्याच

वर्गावर व्यवस्थित अध्यापन करू शकत नाही· विद्यार्थीसंख्या अफाट त्यामुळे त्यांच्यामध्ये जाणीवपूर्वक मूल्यसंक्रमाणासाठी आवश्यक असणारा वेळ शिक्षकाकडे असत नाही· तसेच विद्यार्थ्यांकडून मूल्यस्वीकृती झाली की नाही याबाबत त्यास आढावाही घेता येत नाही· थोडक्यात मूल्य संक्रमणाकडे त्यांचे दुर्लक्ष होते· त्यामुळे प्रतिसादकांनी वरील प्रतिपादन योग्य वाटते·

सारणी क्रमांक ५·६ मध्ये चित्रपट, दूरदर्शन व जाहिरातबाजी यांचा बालमनावर अनिष्ट परिणाम होतो· त्यामुळे मूल्य संक्रमण प्रभावी होत नाही· असा प्रतिसाद ३२ प्रतिसादकांपैकी २ प्रतिसादकांनी ( ६·२५%) नोंदलेला आहे·


सध्याच्या चित्रपटांचे दूरदर्शनावरील कांही कार्यक्रम व जाहिराती यांचे स्वरूप पाहिले तर प्रतिसादकाचे मत कांही अंशी ग्राहय मानावे लागते· ही साधणे समाजप्रबोधनाची, समाजजागृतीची साधने म्हणून ओळखली जातात व त्यांचा समाजमनावरील प्रभाव ही जबरदस्त आहे· परंतु समाजजीवनाकडे पाहिले तर मूल्यपोषक वातावरणाचा अभाव सर्वच क्षेत्रात मूल्यांचा प्रचंड ऱ्हास दिसतो आहे· त्यामुळे समाजामध्ये मूल्यपोषक वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे· यासाठी या समाज प्रबोधनाची साधनोद्वारे प्रदर्शित होणारे कार्यक्रम व मूल्य शिक्षण यात समन्वय राखण्यासाठी शाळांमधून बालकावर केले जाणारे संस्कार व प्रकाशित होणारे कार्यक्रम यामध्ये मूल्य पोषक वातावरण निर्मीती साठी खास प्रयत्न हवा· या साधनांच्या सहाय्याने आपणास प्रभावीपणे मूल्य संक्रमित करता येऊ शकतील व समाजामध्ये होत असलेला मूल्यांचा ऱ्हास थांबवणे शक्य होईल·

## ५·५ पाठांतील मूल्यांचे संक्रमित होण्याचे प्रमाण :

प्रश्नावलीतील प्रश्नक्रमांक १० आपण संक्रमित करू इच्छिणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये किती प्रमाणात संक्रमित होतात ? हा बंदिस्त स्वरूपाचा प्रश्न होता. संक्रमित मूल्यांचे प्रमाण जाणून घेण्यासाठी उत्तराचे ठिकाणी पांच प्रमाणके दिलेली होती व प्रतिसादक ज्या प्रमाणकाशी सहमत असेल त्या प्रमाकाच्या पुढे बरोबर ( ✓) अशी होकारात्मक खूण करण्यास सांगीतली होती· अध्यापकांनी

# मूल्य संक्रमणाचे प्रमाण

स्केल: १ सें.मी = ५ शिक्षक



प्रमाणकांना दिलेला प्रतिसाद पुढील सारणी क्रमांक ५·७ मध्ये मांडलेला आहे·

सारणी क्रमांक ५·७

मूल्य संक्रमणाचे प्रमाण

| अ·नं· | प्रमाणके | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडाप्रमाण |
|---|---|---|---|
| १· | मूल्ये फार मोठ्या प्रमाणात संक्रमित होतात | २ | १·८७% |
| २· | मूल्ये मोठ्या प्रमाणात संक्रमित होतात | २८ | २६·४२% |
| ३· | मूल्ये अल्प प्रमाणात संक्रमित होतात | ५४ | ५०·९४% |
| ४· | मूल्ये अत्यल्प प्रमाणात संक्रमित होतात | २२ | २०·७५% |
| ५· | मूल्ये अजिबात संक्रमित होत नाहीत | ०० | ०० % |
| | एकूण ·· | १०६ | १०० % |

वरील सारणी क्रमांक ५·७ मधील अनुक्रमांक १ मध्ये मूल्ये फार मोठ्या प्रमाणात संक्रमित होतात· यास १०६ पैकी २ प्रतिसादकांनी (१·८७%) प्रतिसाद दिलेला आहे· तसेच अनुक्रमांक २ मधील मूल्ये मोठ्या प्रमाणात संक्रमित होतात· यास १०६ प्रतिसादकांपैकी २८ प्रतिसादकांनी (२६·४२%) प्रतिसाद दिलेला आहे·

" फार मोठ्या प्रमाणात " व मोठ्या प्रमाणात " मूल्ये संक्रमित होतात असे प्रतिपादन करणारे एकूण (२८·२९%) प्रतिसादक आहेत·

अनुक्रमांक ३ मध्ये मूल्ये अल्प प्रमाणात संक्रमित होतात असे १०६ प्रतिसादकांपैकी ५४ प्रतिसादकांनी (५०·९४%) प्रतिसाद दिलेला आहे· व अनुक्रमांक ४ मध्ये मूल्ये अत्यल्प प्रमाणात संक्रमित होतात असे १०६ पैकी २२ प्रतिसादकांनी (२०·७५%) प्रतिसाद दिलेला आहे·

अल्प व अत्यल्प प्रमाणात मूल्ये संक्रमित होतात•असा प्रतिसाद देणारे प्रतिसादक ७१•६९ % आहेत• याचा अर्थ मोठया अथवा फारमोठया प्रमाणावर मूल्ये संक्रमित होत नाहीत• तर अल्प अथवा अत्यल्प प्रमाणात मूल्ये संक्रमित होतात हे प्रमाणकांना दिलेल्या (मिळालेल्या) प्रतिसादावरुन स्पष्ट होते•

अनुक्रमांक ५ मध्ये मूल्ये अजिबात संक्रमित होत नाहीत• याला एकाही प्रतिसादकांने प्रतिसाद दिलेला नाही• हे योग्य आहे कारण मुले म्हणजे केवळ दगड नव्हेत• त्यांच्या मध्ये सूक्ष्म प्रमाणात कां होईना मूल्ये संक्रमित होत असलीच पाहिजेत•

सदरचे संशोधन हा चिकित्सक अभ्यास असल्याने मूल्ये फार मोठया प्रमाणात संक्रमित कां होत नाहीत अथवा मोठया प्रमाणात कां होत नाहीत हे जाणून घेण्याचे दृष्टीने पुढील प्रश्न क्रमांक ११ : विद्यार्थ्यांमध्ये ही मूल्ये संक्रमित होत नसतील तर त्याची कोणती कारणे संभवतात ? या प्रश्नाची योजना केलेली होती• या प्रश्नास १०६ प्रतिसादकापैकी ६५ प्रतिसादकांनी (६१%) प्रतिसाद दिलेला आहे• या ६१% प्रतिसादकांनी सुचविलेल्या प्रतिसादामधून समान आशयाचे प्रतिसाद एकत्रित करुन मूल्ये संक्रमित न होण्याची कारणे व त्यांची वारंवारिता पुढील सारणी क्रमांक ५•८ मध्ये नोंदलेली आहेत•

सारणी क्रमांक ५•८

मूल्ये संक्रमित न होण्याची कारणे

| अ•नं• | कारणे | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडाप्रमाण |
|---|---|---|---|
| १• | शिक्षणाद्वारे संक्रमित केलेली मूल्ये कौटुंबिक व सामाजिक परिस्थितीत टिकतील असे वातावरण नाही व मूल्ये ढासळलेली सामाजिक परिस्थिती यांच्या प्रभावामुळे मूल्य संक्रमण अल्प आहे• | २४ | ३६•९२% |

सारणी क्रमांक ५·८ पुढे चालू ····

| अ·नं· | कारणे | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| २· | पालक व विद्यार्थी यांचा परीक्षार्थी दृष्टीकोन घोकंपट्टी करुन केवळ पुस्तकी ज्ञान वाढवण्याकडे लक्ष त्यामुळे मूल्य संक्रमणाकडे दुर्लक्ष | १६ | २४·६२% |
| ३· | अपुरी शिक्षक संख्या, वर्गातील वाढती विद्यार्थी संख्या यामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांत आपुलकीची भावना, जिव्हाळा नाही· | १० | १५·३८% |
| ४· | पाठ शिकवल्यावर मूल्यांच्या दृष्टीकोनातून त्याचा पडताळा घेतला जात नाही· | ६ | ९·२३% |
| ५· | पालकाकडून, समाजाकडून मूल्य संक्रमणाबाबत पुरेसे सहकार्य मिळत नाही· | ५ | ७·६९% |
| ६· | मूल्य संक्रमणाच्या दृष्टीने शालेय वातावरण प्रभावशाली नाही व शैक्षणिक साधनांचा अभाव | ३ | ४·६२% |
| ७· | विद्यार्थ्यांचे लहान वय त्यामुळे त्यांचे खेळाकडे लक्ष अधिक असते· त्यामुळे मूल्य संक्रमण नाही· | १ | १·५४% |
| | एकूण ·· | ६५ | १०० % |

सारणी क्रमांक ५·८ मधील अनुक्रमांक १ मध्ये शिक्षणाद्वारे संक्रमित केलेली मूल्ये कौटुंबिक, सामाजिक परिस्थितीत टिकतील असे वातावरण नाही व मूल्ये ढासळलेली सामाजिक परिस्थिती यांच्या प्रभावामुळे मूल्य संक्रमण अल्प आहे· असा ६५ प्रतिसादकांपैकी २४ प्रतिसादकांनी ( ३६·९२%) प्रतिसाद दिलेला आहे· एकूण

१०६ प्रतिसादकांचा विचार करता हे प्रमाण २२·६४% इतके आहे·

आजचा विद्यार्थी ज्या कौटुंबिक व सामाजिक वातावरणात वाढतो आहे त्याबाबतच्या परिस्थितीचे विवेचन (मूल्येजाणीव पूर्वक संक्रमित केली जात नसल्याची अन्य कारणे सारणी क्रमांक ५·६ मधील अनुक्रमांक २ मध्ये) केलेले आहे· त्याची इथे पुनरुक्ती होऊ नये म्हणून याचा उहापोह इथे केलेला नाही·

वरील सारणीतील अनुक्रमांक २ मध्ये पालक व विद्यार्थी यांचा परीक्षार्थी दृष्टिकोन, घोकंपट्टी करुन केवळ पुस्तकीज्ञान वाढवण्याकडे लक्ष, त्यामुळे मूल्य संक्रमनाकडे दुर्लक्ष, असा ६५ प्रतिसादकांपैकी १६ प्रतिसादकांनी (२४·६२%) प्रतिसाद दिलेला आहे· एकूण १०६ प्रतिसादकांचा विचार करता हे प्रमाण (१५·०९%)इतके आहे·

प्रत्येक पालकाची आपला मुलगा चांगल्या गुणांनी परीक्षा उत्तीर्ण व्हावा अशी अपेक्षा असते· कारण शिक्षणाकडे चरितार्थाचे साधन म्हणून पाहिले जाते, चांगल्या गुणांनी परीक्षा उत्तीर्ण होऊन चांगली नोकरी मिळविणे ही शिक्षणाकडून अपेक्षा धरलेली आहे· त्यामुळे शिक्षण द्यावयाचे म्हणजे चांगले गुण मिळवून परीक्षा उत्तीर्ण व्हावयाचे असा समज आहे· परीक्षेत उत्तम गुण मिळवणे म्हणजे उत्तम शिक्षण अशी समाजाची धारणा झालेली आहे· पण प्रत्यक्षात अशा व्यक्तीकडून जीवनात शिक्षणाच्या किती भागाचे अनुकरण केले जाते याचा विचार केला जात नाही· शिक्षण हे व्यक्तिविकासाचे महत्वाचे साधन मानले जाते· शिक्षणाद्वारे व्यक्तीचा सर्वांगिण विकास साधला जातो· परंतु आजचे शिक्षण हे परीक्षा पद्धतीच्या विळख्यात सापडलेले आहे· परीक्षा उत्तीर्ण झाले, गुण चांगले पडले म्हणजे उत्कृष्ट शिक्षण समजले जाते· परीक्षा हया केवळ स्मरणाचीच चाचणी असल्याने मूल्य संक्रमणाच्यादृष्टीने प्रतिसादकाचे वरील मत ग्राहय मानावयास हरकत नाही·

अनुक्रमांक ३ मध्ये अपुरी शिक्षक संख्या, वर्गातील वाढती विद्यार्थी संख्या यामुळे शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये आपुलकी, जिव्हाळ्याची भावना नाही असा प्रतिसाद

६५ प्रतिसादकांपैकी १० प्रतिसादकांनी (१५·३८%) दिलेला आहे· एकूण प्रतिसादकांचा १०६ चा विचार करता हे प्रमाण ( ९·४३% ) इतके आहे·

भरमसाठ विद्यार्थी संख्येमुळे विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देता येत नाही· शिवाय त्यांच्याशी शिक्षकास जवळीक साधता येत नाही· प्राथमिक स्तरावरील हे विद्यार्थी नुकतेच कौटुंबिक वातावरणातून शालेय वातावरणात आलेले असतात· त्यांना माया, ममता, प्रेम, जिव्हाळा यांची गरज असते व ते आपल्या आवडत्या व्यक्तीचा शब्द प्रमाण मानत असतात· परंतु भरमसाठ विद्यार्थी संख्येमुळे हे शक्य नसते· अशावेळी विद्यार्थ्यांमध्ये मूल्य संक्रमण प्रभावीपणे होत नाही· प्रतिसादकांनी सुचविलेला वरील प्रतिसाद ग्राहय वाटतो· याबाबत अधिक विवेचन यापूर्वीच केल्या मुळे द्विरुक्तीचा दोष टाळला जावा म्हणून येथे पुन्हा तेच विवेचन देत नाही· ( कृपया उपप्रकरण ५·४ मधील सारणी क्रमांक ५·६ मधील अनुक्रमांक ४ थे विवेचन पहावे )

अनुक्रमांक ४ मध्ये पाठ शिकवल्यावर मूल्यांच्या दृष्टिकोनातून त्याचा पडताळा घेतला जात नाही· असा प्रतिसाद ६५ प्रतिसादकांपैकी ६ प्रतिसादकांनी ( ९;२३% ) दिलेला आहे· एकूण प्रतिसादकांचा विचार करता हे प्रमाण शेकडा ५·६६% इतके अल्प आहे·

सध्याच्या मूल्यमापन पध्दतीतून आपण मूल्यांच्या स्वीकाराबाबत निश्चित कांही सांगू शकतो कां ? ही मूल्यमापन पध्दतीने योग्य त-हेने मूल्यांचा पडताळा घेउ शकेल का ? याबाबत साशंकता आहे· तसेच व्यक्तीने मूल्यांचा स्वीकार केला आहे की नाही हे एखाद्या प्रसंगावतील त्या व्यक्तीच्या वर्तनावरुन आपण ठरवत असतो· थोडक्यात मूल्यांचे मोजमाप हे त्या व्यक्तीच्या वर्तनाचे निरीक्षण करुन ठरवत असतो· त्यामुळे वरील विधानास अल्प प्रतिसाद असला तरी ते ग्राहय वाटते·

अनुक्रमांक ५ मध्ये पालकांकडून समाजाकडून मूल्य संक्रमणाबाबत पुरेसे सहकार्य मिळत नाही· असा प्रतिसाद ६५ प्रतिसादकांपैकी ५ प्रतिसादकांनी(७·६९%)

नमूद केला आहे. एकूण प्रतिसादकांचा विचार करता हे प्रमाण शेकडा ४.७२ पेक्षा कमी आहे.

बालकाचा सर्वांगिण विकास शिक्षणाद्वारे साधावयाचा असेल तर शाळा व घर यामधून होणा-या संस्कारात एकसूत्रता पाहिजे व ही एकसूत्रता निर्माण करावयाची असेल तर पालकाकडून मूल्य संक्रमणाच्या संदर्भात योग्य सहकार्य मिळाले पाहिजे. पालकांचे सहकार्य प्राप्त झालेतर आपोआपच समाजाकडून ही अपेक्षित साहाय्य मिळू शकेल.

अनुक्रमांक ६ मध्ये मूल्यसंक्रमणाच्या दृष्टीने शालेय वातावरण प्रभावशाली नाही व शैक्षणिक साधनांचा अभाव असा प्रतिसाद ६५ प्रतिसादकांपैकी ३ प्रतिसादकांनी ( ४.६२ % ) नोंदला आहे. एकूण १०६ प्रतिसादकाचा विचार करता हा प्रतिसाद शेकडा २.८३ आहे. शालेय वातावरण प्रभावशाली नाही व शैक्षणिक साधनांचा अपुरा पुरवठा व वापर यामुळे प्रभावी अध्यापन होत नाही. ह्या आजच्या समस्या आहेत. या समस्यांची मुळे आपल्या एकूण आर्थिक परिस्थितीत दडलेली आहेत. त्यामुळे वरील परिस्थितीत मूल्ये संक्रमणाची अत्यंत आवश्यकता आहे.

सारणी क्रमांक ५.८ मधील अनुक्रमांक ७ मध्ये ६५ प्रतिसादकांपैकी १ प्रतिसादकाचे (१.५४ %) पुढील प्रतिसाद नोंदला आहे. विद्यार्थ्यांचे लहान वय त्यामुळे त्यांचे खेळाकडे लक्ष अधिक असते. त्यामुळे मूल्य संक्रमण नाही.

लहान वयात खेळाचे आकर्षण असणे मानसशास्त्राच्या दृष्टीने विचार केल्यास निरोगीपणाचेच लक्षण मानावे लागेल. मात्र त्यामुळे मूल्य संक्रमण करता येत नाही हे कारण पटणारे नाही. त्यांचे कारण असे की मूल्य केवळ वर्गामध्ये मातृभाषेच्या पाठांचे अध्यापन करत असतानाच रुजवायची असतात असे नाही. खेळाच्या मैदानावर सुध्दा प्रत्यक्ष खेळताना मूल्ये रुजविता येतात. इतकेच नव्हे तर, मूल्य रुजविण्याची ती एक फार मोठी संधी आहे.

## ५.६ मूल्य संक्रमणातील अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांचे महत्व :

पाठय पुस्तकातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यामध्ये चांगल्या-त-हेने संक्रमित होण्यासाठी काय केले पाहिजे, हे जाणून घेण्यासाठी प्रश्न क्रमांक १२ : पाठयपुस्तकांतून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यामध्ये चांगल्या त-हेने संक्रमित होण्यासाठी काय केले पाहिजे १ या प्रश्नाची योजना केली होती. याबाबत प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादामधून समान आशयाचे प्रतिसाद एकत्र करून मूल्ये विद्यार्थ्यामध्ये चांगल्या त-हेने संक्रमित होण्यासाठी त्यांनी सुचविलेले मार्ग व त्याची वारंवारिता पुढील सारणी क्रमांक ५.९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्रमांक ५.९

मूल्ये चांगल्या त-हेने संक्रमित होण्यासाठी सुचविलेले मार्ग

| अ.नं. | मूल्य संक्रमित होण्यासाठी सुचविलेले मार्ग | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | शाळेमध्ये अभ्यासपूरक व अभ्यासेतर कार्यक्रमांचे आयोजन करणे. त्यात मुलांचा सहभाग वाढविणे. | ४० | ३७.७४% |
| २. | पौराणिक, ऐतिहासिक उदाहरणे दाखले, कथा द्वारा विद्यार्थ्यात मूल्ये संक्रमित करणे. | ३० | २८.३०% |
| ३. | अंधश्रध्दा त्यातील खरेखोटेपणा प्रत्यक्ष दाखविणे वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे तर्कशुध्द विचार शक्ती विकसित करणे. | १८ | १६.९८% |
| ४. | मुलांशी जवळीक साधून त्यांच्या अडीअडचणी समजून घेणे, त्यांची जिज्ञासूवृत्ती निरीक्षणशक्ती विकसित करणे. जीवनातील मूल्यांचे महत्व समजावून देणे. | १६ | १५.०९% |

सारणी क्रमांक ५.९ पुढे चालू ....

| अ.नं. | मूल्य संक्रमित होण्यासाठी सुचविलेले मार्ग | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ५. | पालक व समाज यांचे सहकार्य घेवून शालेय वातावरण व सामाजिक परिसर मूल्य पोषक ठेवणे. | १२ | ११.३२% |
| ६. | मूल्यांवर आधारित पाठांची रचना करुन मूल्य केंद्रीत अध्यापन करणे याकरिता अभ्यासक्रम पुर्नरचना करावी. | १० | ९.४३% |
| ७. | स्वत:चा आदर्श शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर ठेवावा. | ८ | ७.५४% |
| | एकूण .. | १३४ | |

टीप : प्रश्नावलीस प्रतिसाद देणा-या शिक्षकांपैकी कांही शिक्षकांनी एकाहुन अधिक मार्ग सुचविल्यामुळे बेरीज १०६ हून अधिक आलेली आहे.

वरील सारणी क्रमांक ५.९ मधील अनुक्रमांक १ मध्ये शाळेमध्ये अभ्यासपूरक व अभ्यासेतर कार्यक्रम योजावेत व त्यामध्ये मुलांचा सहभाग वाढवावा तसेच चांगल्या व वाईट गोष्टींबाबत चर्चा करुन विद्यार्थ्यांमध्ये मूल्य जागृती करावी असे मत १०६ प्रतिसादकांपैकी ४० प्रतिसादकांनी (३७.७४%) नमूद केले आहे.

प्रतिसादकांचे वरील मत ग्राह्य धरावयास हरकत नाही. कारण शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांगिण विकास साधला जातो. शाळेमध्ये विहित अभ्यासक्रम पूर्ण केला जातोच पण विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौध्दिक, मानसिक, भावनिक व सामाजिक विकास सुयोग्य होण्यासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांची नितांत गरज असते. विद्यार्थ्यांनी अशा कार्यक्रमात सहभाग घेतल्याने त्यांच्यात

सामाजिकता येते, स्वतंत्रपणे जबाबदारी पेलण्याची कुवत, आत्मविश्वास निर्माण होतो, इष्ट व अनिष्ट गोष्टींवर चर्चा करुन योग्य निर्णय घेता येतो. त्यामुळे भावी जीवन जगण्यासाठी चांगल्या /वाईटांची निवड व्यवस्थितपणे करण्यासाठी शाळांमधून असे उपक्रम राबवणे आवश्यक आहे. तो जीवनातील सत् / असत् या बाबत योग्य निर्णय घेतो यावरुन त्याच्यात मूल्यांबाबत जागृती झालेली आहे. असे म्हणावेसे वाटते. म्हणून मूल्ये चांगल्या त-हेने संक्रमित होण्यासाठी असे उपक्रम योजने आवश्यक आहे.

अनुक्रमांक २ मध्ये १०६ प्रतिसादकापैकी ३० प्रतिसादकांनी (२८.३०%) प्रतिसाद नोंदलेला आहे. यांच्या मते विद्यार्थ्यामध्ये "पौराणिक, ऐतिहासिक उदाहरणे, दाखले विविध कथा द्वारे मूल्ये संक्रमित करावीत." असे प्रतिपादन केलेले आहे.

वरील मताचा परामर्ष याच प्रश्नावली मधील प्रश्न क्रमांक ८ मध्ये मूल्ये संक्रमित करण्याचे मार्ग या सारणी क्रमांक ५.४ मधील अनुक्रमांक १ ची चर्चा करताना घेतलेला आहे. ( कृपया पान क्र. ८७ पहा ) पुनरुक्तीचा दोष टाळण्यासाठी याचा येथे पुन्हा ऊहापोह केलेला नाही.

सारणी क्रमांक ५.९ मधील अनुक्रमांक ३ मध्ये अंधश्रध्दा त्यातील सत्यासत्यता प्रत्यक्ष दाखविणे, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे आणि तर्कशुध्द विचारशक्ती विकसित करणे असा प्रतिसाद १०६ प्रतिसादकांपैकी १८ प्रतिसादकांनी (१६.९८%) दिलेला आहे.

शिक्षणाद्वारे व्यक्तीची केवळ विचार प्रक्रियाच नव्हे तर विवेचकशक्ती सुधारत असते. दुस-याची मते, विचार आहे तसे स्वीकारण्यापेक्षा ती पारखून घेण्याची सवय शिक्षणाने लागली पाहिजे व शिक्षणाचे ते उद्दिष्टच आहे. आपला समाज हा रुढी, परंपरा, अंधश्रध्दा यांच्या जबरदस्त पगडयाखाली जीवन कंठतो आहे. त्याचा परिणाम म्हणून कांही अनिष्ट गोष्टी ही चांगल्या सोबत आलेल्या आहेत. या सर्वांमधून चांगले काय ? वाईट काय ? कोणत्या रुढी,

परंपरा योग्य ? कोणत्या त्याज्य ? यातून काय स्वीकारले पाहिजे हे शिक्षणाद्वारे व्यक्तीस निवडता आले पाहिजे. तसेच कोणताही निर्णय योग्य त-हेने घेण्याची गरज असते व ज्या व्यक्तीची वैचारिक पातळी विकसित झालेली असते ती व्यक्ती आपोआपच तर्कशुध्द वैचारिक बैठक असलेली तयार होते. अशी व्यक्ती आपल्या अंगी योग्य मूल्यांचा स्वीकार करते. त्यामुळे प्रतिसादकांनी वर नमूद केलेले मत ग्राहय आहे.

अनुक्रमांक ४ मध्ये मुलांशी जवळीक साधून त्यांच्या अडीअडचणी समजून घेणे, त्यांची जिज्ञासावृत्ती, निरीक्षणशक्ती विकसित करणे व मूल्यांचे जीवनातील महत्व समजावून देणे असा प्रतिसाद १०६ प्रतिसादकापैकी १६ प्रतिसादकांनी (१५.०९ %) नोंदलेला आहे.

वरील प्रतिसादाचा विचार करता तो महत्वाचा वाटतो. कारण विद्यार्थ्यांच्या मनामध्ये प्रथम शिक्षकाबद्दल विश्वास, आपुलकी, व जिव्हाळा वाढला पाहिजे. तरच त्यांनी सांगीतलेली प्रत्येक गोष्ट ते विनातक्रार व व्यवस्थित स्वीकारतील, अन्यथा नाही.

तसेच आपल्या जीवनात मूल्यांचे स्थान किती महत्वपूर्ण आहे हे समजल्यामुळे मूल्यस्वीकृतीबाबत त्यांच्या मनाची तयारी होऊ शकेल व त्यामुळे मूल्यांचे संक्रमण प्रभावी होण्यास मदत होईल असे वाटते. तसेच निरीक्षणशक्ती, जिज्ञासूवृत्ती यांच्या विकासामुळे मूल्य प्रतिबिंबित व्यक्तीचे निरीक्षण करु शकतील. जिज्ञासूवृत्तीमुळे मूल्यांबाबत अधिक माहिती मिळवून आपले जीवन अधिकाधिक मूल्ययुक्त करण्याचा प्रयत्न करु शकतील. म्हणून प्रतिसादकांचे वरील मत संयुक्तिक वाटते.

अनुक्रमांक ५ मध्ये पालक व समाज यांचे सहकार्य घेऊन शालेय वातावरण व सामाजिक परिसर मूल्य पोषक ठेवणे; असा प्रतिसाद १०६ प्रतिसादकांपैकी १२ प्रतिसादकांनी (११.३२%) दिलेला आहे.

शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती आहे, असे म्हटले जाते. या शालेय विश्वात भावी नागरिकांची योग्य वाढ व विकास करण्याची जबाबदारी शाळेवर टाकलेली असते. त्यामुळे शाळेमधून त्यांच्या संपन्न भावी जीवनाच्या दृष्टीने प्रयत्न केले जातात. त्यांच्यावर जाणीवपूर्वक संस्कार केले जातात. त्या संस्कारांचा प्रभाव कमी होऊ नये अथवा त्यास विरोधी वातावरण घर अथवा समाजाकडून निर्माण होऊ नये म्हणून पालक व समाज यांनी जागरूक असणे आवश्यक आहे. शाळेतून केले जाणारे संस्कार हे जाणीवपूर्वक व विशिष्ट असे केले जातात. यासाठी पालक व समाज यांचे वातावरण शालेय संस्कार जपणारे हवे. यासाठी शाळेतून केले जाणारे संस्कार हे दृढ व प्रभावी होण्यासाठी समाजात आढळणारे दोष, दुर्गुण यांचे सावट शाळेवर पडू नये. असे झाले तरच मूल्य संक्रमण प्रभावी होऊ शकेल. हे प्रतिसादकांचे म्हणणे मान्य करावे लागते.

अनुक्रमांक ६ मध्ये मूल्यांवर आधारित पाठांची रचना करून मूल्य केंद्रित अध्यापन करणे. या करिता अभ्यासक्रम पुर्नरचना करावी. असे प्रतिपादन १०६ प्रतिसादकांपैकी १० प्रतिसादकांनी (९.४३%) नमूद केलेले आहे.

प्रतिसादकांनी प्रतिसाद दिलेल्या वरील मताचा ऊहापोह प्रश्न क्रमांक ८ मधील " मूल्ये संक्रमित करण्याचे मार्ग " या सारणी क्रमांक ५.४ मधील अनुक्रमांक २ ची चर्चा करतांना केलेला आहे. (पान क्रमांक ८८ पहा) पुनरुक्तीचा दोष टाळण्यासाठी तो भाग येथे दिलेला नाही.

पाठांची रचना मूल्यांवर आधारित केल्याने शिक्षकास पाठांमधून नेमके काय शिकवावयाचे ? विद्यार्थ्यांवर कोणते संस्कार करावयाचे याची नेमकी कल्पना येते. त्यामुळे मूल्यांवर आधारित पाठांची रचना केली पाहिजे हे त्यांचे मत ग्राहय वाटते. पाठ नियोजनाची अशी रचना करावयाची म्हणजेच जो अभ्यासक्रम शिक्षकांना वर्षभर संपवण्यासाठी दिलेला असतो त्याची यादृष्टिने विशिष्ट अशी रचना करणे आवश्यक असते. त्या दृष्टिने सध्याच्या अभ्यासक्रमातील पाठ हे मूल्ये असलेले आहेत. त्यामुळे प्रतिसादकांचे वरील मत ग्राहय वाटत नाही.

सारणी क्रमांक ५·९ मधील अनुक्रमांक ७ मध्ये स्वत:चा आदर्श शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर ठेवावा असा प्रतिसाद १०६ प्रतिसादकांपैकी ८ प्रतिसादकांनी (७·५४%) दिलेला आहे·

वरील प्रतिसादांची चर्चा प्रश्नावली मधील प्रश्न क्रमांक ८ मध्ये मूल्य संक्रमणाचे मार्ग या सारणी क्रमांक ५·४ मधील अनुक्रमांक ५ ची चर्चा करतांना केलेली आहे· त्यामुळे पुनरुक्ती टाळण्यासाठी या प्रतिसादाचा येथे पुन्हा ऊहापोह केलेला नाही·

पाठ्यपुस्तकांतील पाठांमधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये विद्यार्थ्यात संक्रमित करण्याच्यादृष्टीने शिक्षक शाळेमध्ये अभ्यासपूरक कार्यक्रमाद्वारे कांही प्रयत्न करतात काय १ हे जाणून घेण्याच्या उद्देशाने त्यांना प्रश्न क्रमांक १३ हा होय/नाही (बंदिस्त) उत्तराच्या स्वरूपाचा प्रश्न योजला होता· त्यास प्रतिसादकांनी दिलेला प्रतिसाद सारणी क्रमांक ५·१० मध्ये दिलेला आहे·

सारणी क्रमांक ५·१०

मूल्ये संक्रमित करण्याच्या उद्देशाने अभ्यासपूरक कार्यक्रम योजतात की नाही हे जाणून घेणे

| अ·नं· | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादकाचे शेकडाप्रमाण |
|---|---|---|---|
| १· | होय | १०६ | १००% |
| २· | नाही | --- | --- |
| | एकूण ·· | १०६ | १००% |

वरील सारणी क्रमांक ५·१० वरून असे आढळून येते की, १००% शिक्षक मूल्य संक्रमित करण्याच्या उद्देशाने अभ्यासपूरक कार्यक्रम योजतात·

अभ्यासपूरक कार्यक्रमांची मूल्य संक्रमणाच्या उद्देशाने योजना केली जाते असे प्रतिपादन करणा-या अध्यापकांसाठी प्रश्न क्रमांक १४ विचारला होता. या प्रश्नाद्वारे ते योजत असलेले उपक्रम व त्या उपक्रमांतून बिंबवू इच्छित असलेल्या मूल्यांची नोंद करण्यास सांगीतले होते. या बाबत प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादामधून समान प्रतिसाद एकत्र करुन ते योजत असलेले उपक्रम व त्यातून बिंबवू इच्छित असलेली मूल्ये आणि त्याची वारंवारिता पुढील सारणी क्रमांक ५.११ मध्ये नोंदलेली आहे.

सारणी क्रमांक ५.११

शाळेत योजत असलेले अभ्यास पूरक उपक्रम व त्यातून बिंबवू इच्छिणारी मूल्ये

| अ.नं. | उपक्रमाचे नाव | बिंबवू इच्छिणारी मूल्ये | वारंवारिता |
|---|---|---|---|
| १. | सहल | निसर्ग प्रेम, परिस्थितीशी समायोजन साधणे, सहकार्य, धाडस | ४६ |
| २. | राष्ट्रीय दिवस, सण, जयंत्या, पुण्यतिथ्या, साज-याकरणे. | देशभक्ती, राष्ट्राभिमान | ३८ |
| ३. | विविध शिबीरे, श्रमदान समाजसेवा इत्यादी | श्रमप्रतिष्ठा, सेवाभाव, सामाजिक जबाबदारीची जाणीव | ३३ |
| ४. | विविध त-हेचे सांस्कृतिक कार्यक्रम | मनोरंजन, ज्ञानवृध्दी, उपजत कलागुणांना वाव देणे. | २६ |
| ५. | विविध स्पर्धा - | | |
| | अ) क्रीडा स्पर्धा | खिलाडूवृत्ती, आत्मविश्वास, साहस इ. जोपासणे. | २२ |

सारणी क्रमांक ५·११ पुढे चालू ····

| अ·नं· | उपक्रमाचे नांव | बिंबवू इच्छिणारी मूल्ये | वारंवारिता |
|---|---|---|---|
| ५· | ब) बाल सभा/ वाद-विवाद स्पर्धा | सभाधीटपणा, वक्तृत्वगुण विकास, हजरजबाबीपणा· | १६ |
| ६· | सण, समारंभ साजरे करणे उदा·तिळगुळ, सोने देणे इत्यादी· | बंधुभाव, एकता | १४ |
| ७· | वनभोजन, सहभोजन | जातीभेद निर्मूलन, एकमेकांबद्दल जिव्हाळा, प्रेम | १२ |
| ८· | वृक्षारोपन कार्यक्रम | वृक्षारोपन, वृक्ष संवर्धन, वृक्षसंगोपन | १२ |
| ९· | विविध त-हेची प्रदर्शने भरविणे | जिज्ञासूवृत्ती, चिकित्सकवृत्ती विकास विज्ञानाबद्दल आवड, नवनिर्मितीचा आनंद, संशोधन वृत्ती· | १० |
| १०· | इमारत, परिसर, स्वच्छता | श्रमप्रतिष्ठा, स्वच्छता, बंधुभाव, सर्वधर्म | १० |
| ११· | विविध धार्मियांचे सण· उदा·ख्रिसमस, पारशी दिन, ईद साजरे करणे· | बंधुभाव, सर्वधर्मसमभाव | ९ |
| १२· | शाळेत विद्यार्थ्यांचा वाढदिवस साजरा करणे | स्वाभिमान जागृती | ८ |
| १३· | कथाकथन | ज्ञानप्राप्ती, आनंदप्राप्ती | ७ |
| १४· | प्रार्थना | मन:शांती, मन बुध्दी स्थिरता | ६ |
| | | | २६९ |

वरील सारणी क्रमांक ५•११ वरून असे निदर्शनास येते की विविध शाळांमधून मूल्य संक्रमणासाठी विविध असे उपक्रम योजले जातात•

वरील उपक्रमांपैकी कांही उपक्रम हे सर्व शाळांमधून योजले जातात असे आढळते• उदा• सहल, राष्ट्रीयदिवस, जयंत्या इत्यादी• याउलट कांही उपक्रम कांही ठराविक शाळांमध्येच योजले जातात हे त्यांना मिळालेल्या प्रतिसादावरुन निदर्शनास येते•

" प्रार्थना " हा उपक्रम सर्व प्राथमिक स्तरावर सर्व शाळांमधून राबवला जातो• पण त्याला अत्यल्प प्रतिसाद मिळालेला आहे• याचाच अर्थ प्रार्थनेचा उपयोग विद्यार्थ्यांमध्ये मूल्य संक्रमणासाठी होतो• याचे बहुतेकाना विस्मरण झाले आहे असे वाटते•

शाळेमध्ये सध्या योजत असलेल्या उपक्रमांखेरीज आणखी कांही उपक्रम योजता येतील कां ? हे जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रश्नावली मधील प्रश्न क्रमांक १५ : या उपक्रमाखेरीज आणखी कोणते उपक्रम आयोजित करतां येतील ? या प्रश्नाची योजना केलेली होती• यास प्रतिसादकांनी दिलेला प्रतिसाद खालील सारणी क्रमांक ५•१२ मध्ये दिलेला आहे•

सारणी क्रमांक ५•१२

शाळेत योजता येतील असे अन्य उपक्रम

| अ•नं• | उपक्रमाचे नाव | प्रतिसाद संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १• | शिक्षक पालक मेळावे, चर्चात्मक शिबिरे, स्नेहसंमेलने इत्यादींचे आयोजन करणे | १७ | १६•४ ٪ |
| २• | विज्ञानावर आधारित विविध उपक्रम योजने उदा•विज्ञानप्रदर्शन,वैज्ञानिक दिंडी इ• | १५ | १४•१५٪ |

सारणी क्रमांक ५·१२ पुढे चालू ····

| अ·नं· | उपक्रमाचे नाव | प्रतिसाद संख्या | शेकडाप्रमाण |
|---|---|---|---|
| ३· | शाळेत बालदिन, शिक्षक दिन यांचे अशा दिनांचे आयोजन करणे· | ९ | ८·४९% |
| ४· | प्रेक्षणीय स्थळे, मंदिरे यांना भेटी देणे | ८ | ७·५५% |
| ५· | सहकारी वस्तुभांडारास भेट देणे व त्याच्या कार्याची माहिती देणे· | ७ | ६·६०% |
| ६· | ग्रंथालयास, वस्तुसंग्रहालयास भेटी | ७ | ६·६०% |
| ७· | विविध वस्तूंचे संग्रह करावयास लावून संग्रह प्रवृत्ती जोपासने इ· उदा· धान्य, बिया, पाने, फुले, तिकीटे इत्यादी· | ६ | ५·६६% |
| ८· | मुलांना बालचित्रपट दाखविणे व त्यावर चर्चा करणे· | ४ | ३·७७% |
| ९· | मुलांनी स्वत: तयार केलेल्या साहित्याचे, चित्रांचे प्रदर्शन भरविणे· | ३ | २·८३% |
| १०· | बागेत जाऊन प्रत्यक्षपणे वेगवेगळ्या त-हेची फुले, फुलझाडे वृक्षांची माहिती देणे· | ३ | २·८३% |
| ११· | शाळेमध्ये हळदीकुंकू कार्यक्रम तसेच याप्रमाणे असलेले इतर उपक्रम आयोजित करणे | ३ | २·८३% |
| | एकूण ·· | ८२ | |

वरील सारणी क्रमांक ५·१२ मधील अनुक्रमांक १ मध्ये शिक्षक पालक मेळावे

भरविणे, चर्चात्मक शिबिरे घेणे, स्नेहसंमेलनांचे आयोजन करणे असे प्रतिपादन १०६ पैकी १७ प्रतिसादकांनी ( १६·४% ) केलेले आहे·

अनुक्रमांक २ मध्ये विज्ञानावर आधारित उपक्रम शाळेत योजने असे प्रतिपादन १०६ प्रतिसादकांपैकी १५ प्रतिसादकांनी (१४·१५%) केलेले आहे·

अनुक्रमांक ३ मध्ये शाळेत बालदिन, शिक्षकदिन अशा सारख्या दिनांचे आयोजन करणे असा प्रतिसाद १०६ प्रतिसादकांपैकी ९ प्रतिसादकांनी (८·४९%) दिलेला आहे·

अनुक्रमांक ४ मध्ये प्रेक्षणीय स्थळे मंदिरे यांना भेटी देणे असे प्रतिपादन १०६ प्रतिसादकांपैकी ८ प्रतिसादकांनी (७·५५%) नमूद केले आहे·

अनुक्रमांक ५ मध्ये सहकारी वस्तुभांडारास भेट देणे व त्यांच्या कार्यांची माहिती देणे असा प्रतिसाद १०६ प्रतिसादकांपैकी ७ प्रतिसादकांनी (६·६०%) दिलेला आहे·

अनुक्रमांक ६ मध्ये ग्रंथालय, वस्तुसंग्रहालयास भेटी देणे असा प्रतिसाद १०६ पैकी ७ प्रतिसादकांनी ( ६·६०%) दिलेला आहे·

अनुक्रमांक ७ मध्ये विविध वस्तुंचे संग्रह करावयास लावून संग्रह प्रवृत्ती जोपासने असा प्रतिसाद १०६ पैकी ६ प्रतिसादकांनी ( ५·६६% ) दिलेला आहे·

अनुक्रमांक ८ मध्ये मुलांना बाल चित्रपट दाखविणे व त्यावर चर्चा करणे असे प्रतिपादन १०६ पैकी ४ प्रतिसादकांनी ( ३·७७% ) केलेले आहे·

अनुक्रमांक ९ मध्ये मुलांनी स्वत: तयार केलेल्या साहित्याने चित्रांचे प्रदर्शन भरवावे असे प्रतिपादन १०६ पैकी ३ प्रतिसादकांनी (२·८३%) केलेले आहे·

अनुक्रमांक १० मध्ये बागेत जाऊन प्रत्यक्षपणे वेगवेगळ्या त-हेची फुले, फुलझाडे , वृक्षांची माहिती देणे असा प्रतिसाद १०६ पैकी ३ प्रतिसादकांनी(२·८३%) दिलेला आहे·

अनुक्रमांक ११ मध्ये हळदी कुंकू कार्यक्रम तसेच याप्रमाणे असलेले इतर उपक्रम आयोजित करणे असे प्रतिपादन १०६ पैकी ३ प्रतिसादकांनी ( ६·८३% ) केलेले आहे·

उपरोक्त सारणीमध्ये (सारणी क्रमांक ५·१२) सुचविण्यात आलेले उपक्रम मूल्यसंक्रमणाच्या दृष्टीने उपयुक्त आणि फार परिश्रम न घेता आयोजित करता येण्यासारखे आहेत· तरी ज्या शाळांमधून यापैकी जे उपक्रम आयोजित केले जात नसतील ते शक्य असल्यास आवर्जून आयोजित केले जावेत·

५·७ मूल्य शिक्षणाच्या संदर्भात शिक्षकांनी सहभाग घेतलेल्या शिबिर / कृतिसत्राची माहिती :

मूल्य शिक्षणाच्या संदर्भात इयत्ता १ ते ४ या इयत्तांना अध्यापन करणा-या शिक्षकांनी एखाद्या कृतिसत्रात अथवा शिबिरात भाग घेतला होता काय? हे जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रश्नावलीमधील प्रश्न क्रमांक १६ : मूल्य शिक्षणाच्या संदर्भात एखाद्या कृतिसत्रास वा शिबिरास आपण उपस्थित राहिला आहात काय? या प्रश्नाची योजना केली होती· या प्रश्नास मिळालेला प्रतिसाद सारणी क्रमांक ५·१३ मध्ये दिलेला आहे·

सारणी क्रमांक ५·१३

मूल्य शिक्षण कृतिसत्र / शिबिर यांतील सहभागाबाबत·

| अ·नं· | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १· | होय | ४१ | ३८·६८% |
| २· | नाही | ६५ | ६१·३२% |
| | एकूण ·· | १०६ | १०० % |

एकूण १०६ प्रतिसादकांपैकी ४१ प्रतिसादकांनी (३८.६८%)"होय"असा प्रतिसाद दिलेला आहे. तर ६५ प्रतिसादकांनी (६१.३२%) "नाही" असा प्रतिसाद दिलेला आहे.

ज्या शिक्षकांनी मूल्य शिक्षणाच्या संदर्भात झालेल्या कृतिसत्र /शिबिरात सहभाग घेतला असेल त्यांच्या कृतिसत्र / शिबिराची माहिती मिळवण्याच्या उद्देशाने प्रश्नावलीमधील प्रश्न क्रमांक १७ ते २१ ची योजना केलेली होती. प्रश्न क्रमांक १७ मध्ये कृतिसत्र / शिबिराचे नाव विचारले होते. प्रश्नक्रमांक १८ मध्ये आयोजित करणा-याचे नांव, प्रश्नक्रमांक १९ मध्ये त्याचा कालावधी आणि प्रश्न क्रमांक २० मध्ये नेमके कोणते प्रशिक्षण देण्यात आले? त्याची विचारणा केलेली होती. प्रश्नक्रमांक २१ मध्ये मूल्यशिक्षणाच्या परिणामकारक अध्यापनाच्या दृष्टीने कृतिसत्र / शिबिर परिणामकारक नसल्यास ते अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने कोणत्या सूचना करू इच्छितात ? या संबंधात विचारणा केलेली होती.

वरील सर्व प्रश्नांना मिळालेल्या प्रतिसादाची नोंद सारणी क्रमांक ५.१४ मध्ये केलेली आहे. ( पान नंबर 119 वर पहा )

वरील सारणी क्रमांक ५.१४ मध्ये एकूण १०६ प्रतिसादकांपैकी ४१ प्रतिसादकांनी ( ३८.६८% ) प्रतिसाद दिलेला आहे.

प्रतिसादकांनी दिलेला प्रतिसादामधील एकही शिबिर अथवा कृतिसत्र मूल्य शिक्षणाच्या संदर्भात झालेले आढळून येत नाही. हे सारणी क्रमांक ५.१४ वरून दिसून येते. यावरून मूल्यशिक्षणाच्या एकाही कृतिसत्रात अथवा शिबिरात १०६ प्रतिसादकांपैकी कोणीही सहभागी झालेले नाही असे म्हणणे संयुक्तिक होईल.

## सारणा क्रमांक ५·१४

### मूल्य शिक्षणाच्या संदर्भात झालेल्या कृतिसत्र / शिबिराची माहिती

| अ·नं· | कृतिसत्र/शिबिराचे नांव | कृतिसत्र/ शिबिर आयोजकाचे नांव | कृतिसत्र/ शिबीराचा कालावधी | कृतिसत्र/शिबिरात नेमके कोणते प्रशिक्षण देण्यात आले | मूल्य शिक्षणासंदर्भात शिबिर परिणामकारक नसल्यास कोणत्या सूचना करु इच्छिता | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | (शिक्षक मार्गदर्शक व्यापक कार्यक्रम) | | | | | | |
| १· | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण शिबिर | महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे· | १० दिवस | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण माहिती, शिक्षण बालक केंद्रित व्हावे, कृतिद्वारा शिक्षण | खोल्या प्रशस्त हव्यात प्रायोगिक साहित्य हवे | १२ | ११·३२% |
| २· | शैक्षणिक साहित्य तयार करणे व त्याचा वापर | पंचायत समिती, करवीर | १ दिवस | शैक्षणिक साहित्य अल्पकिंमतीत, टाकावू वस्तुपासून कसे बनवावे व त्याचा वापर कसा करावा· | शिबिराचा कालावधी अपुरा वाटला· | १० | ९·४३% |
| ३· | सधन - अभ्यासक्रम | महाराष्ट्र शासन (शिक्षक प्रशिक्षण संस्था पुणे·) | २८ दिवस | शैक्षणिक गुणवत्ता खालावण्याची कारणे व ती सुधारण्यासाठी उपाय· | मूल्याधारित शिक्षण कसे द्यावे मार्गदर्शन नाही· | ८ | ७·५५% |
| ४· | इंग्रजी शॉर्ट टर्म कोर्स | शिक्षक प्रशिक्षण संस्था, | ३० दिवस | इंग्रजीचे प्रभावी व परिणामकारक अध्यापन कसे करावे· | आदर्श पाठ( मॉडेल लेसन) व्हावा· | ६ | ५·६६% |
| ५· | नवीन अभ्यासक्रम कोर्स | महाराष्ट्र शासन | १५ दिवस | नवीन अभ्यासक्रम व शिक्षकाची भूमिका स्थान,मार्गदर्शन | अनुभवी व तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन व्हावे· | ५ | ४·७२% |

## ५·८ मूल्यांचे मूल्यमापन :

मूल्ये संक्रमित झालेली आहेत की नाही हे जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रश्नावली मधील प्रश्न क्रमांक २२ : मूल्ये संक्रमित झाली आहेत की नाही याचे मूल्यमापन करावे काय ? या प्रश्नाची योजना केली होती· सदर प्रश्नास प्रतिसादकांकडून मिळालेला प्रतिसाद खालील सारणी क्रमांक ५·१५ मध्ये दिलेला आहे·

सारणी क्रमांक ५·१५

मूल्ये संक्रमित झाली आहेत की नाही याच्या मूल्यमापना बाबत

| अ·नं· | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादाचे शेकडाप्रमाण |
|---|---|---|---|
| १· | होय | १०६ | १०० % |
| २· | नाही | --- | --- |
| | एकूण ·· | १०६ | १०० % |

वरील सारणी क्रमांक ५·१५ मध्ये मूल्ये संक्रमित झाले आहेत की नाही याचे मूल्यमापन करावे काय ? या प्रश्नास १०६ प्रतिसादकांनी ( १००% ) होकारार्थी म्हणजेच होय असे उत्तर दिलेले आहे· याचाच अर्थ मूल्य संक्रमणाबाबत मूल्यमापन करावे असे सर्वांचे मत आहे· त्यांचे मूल्यमापन करु नये असे प्रतिपादन एकाही प्रतिसादकाने केलेले नाही·

मूल्ये संक्रमित झाली आहेत की नाही याचे मूल्यमापन करावे काय ? याचे नकारार्थी म्हणजे " नाही " असे उत्तर देणा-या प्रतिसादकांसाठी प्रश्न क्रमांक २३ : " वरील प्रश्नाचे उत्तर नाही असेल तर त्याची कारणे कोणती ?

याची योजना केली होती•

प्रश्न क्रमांक २२ चा १००% प्रतिसाद होकारार्थी " होय " आल्याने प्रश्न क्रमांक २३ चे प्रयोजनच उरत नाही•

मूल्ये किती प्रमाणात रुजलेली आहेत याचे मूल्यमापन करता येईल का? हे जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २४ : मूल्ये किती प्रमाणात रुजली आहेत याचे मूल्यमापन करता येईल काय ? या प्रश्नाची योजना केलेली होती• संबंधित प्रश्नास प्रतिसादक शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद खालील सारणी क्रमांक ५•१६ मध्ये मांडलेला आहे•

सारणी क्रमांक ५•१६

मूल्ये किती प्रमाणात रुजली आहेत याचे मूल्यमापना संबंधीचा प्रतिसाद

| अ•नं• | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १• | होय | १०६ | १०० % |
| २• | नाही | --- | --- |
| | एकूण •• | १०६ | १०० % |

वरील सारणी क्रमांक ५•१६ मध्ये होकारार्थी " होय " असा प्रतिसाद १०६ प्रतिसादकांपैकी १०६ नी ( १००% ) प्रतिसाद दिलेला आहे• मूल्यमापन करता येणार नाही असा नकारार्थी प्रतिसाद १०६ पैकी कोणीही दिलेला नाही•

प्रश्नावलीतील प्रश्नक्रमांक २४ ला होकारार्थी " होय " असा प्रतिसाद देणा-यांसाठी प्रश्नावली मधील प्रश्न क्रमांक २५ : " उत्तर होय " असल्यास

कशा प्रकारे मूल्यमापन करता येईल ते नमूद करावे. असा मुक्त स्वरुपाच्या प्रश्नाची योजना केली होती. त्यास मिळालेल्या प्रतिसादांमधून समान आशयाचे प्रतिसाद एकत्र करुन मूल्यांचे मूल्यमापन कसे करता येईल ते खालील सारणी क्रमांक ५.१७ मध्ये नमूद केलेले आहे.

सारणी क्रमांक ५.१७

मूल्यांचे मूल्यमापन करण्याचे मार्ग

| अ.नं. | मूल्यांचे मूल्यमापन करण्याचे मार्ग | प्रतिसादक संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | लेखी व मौखिक स्वरुपाची परीक्षा घेऊन म्हणजेच विद्यार्थ्यास विविध समस्यांवरील व मूल्यांवरील प्रश्न विचारुन त्यांच्या येणा-या उत्तरांच्या स्वरुपावरुन मूल्यमापन करता येईल. | ६२ | ५८.४९% |
| २. | विद्यार्थ्याचे विविध प्रसंगातील वर्तनाचे निरीक्षण करुन मूल्यांचे मूल्यमापन करता येईल. | ५२ | ४९.०५% |
| ३. | विद्यार्थ्याचे व्यवहारातील वर्तन म्हणजेच आपले सहकारी, समाज, विविध व्यक्ती यांच्याशी तो कसा वागतो यावरुन मूल्यमापन करता येईल. | २० | १८.८७% |
| ४. | वेगवेगळे कार्यक्रम शाळेत आयोजित करुन त्यांची जबाबदारी विद्यार्थ्यांवर टाकून ती पारपाडण्याची त्यांची कार्यपद्धती व एकूण कुवत यांच्यावरुन मूल्यांचे मूल्यमापन करता येईल. | २० | १८.८७% |
| ५. | विद्यार्थ्याचा अध्यायनातील सहभाग आजमावून म्हणजेच कोणतीही गोष्ट आत्मसात करण्याची विद्यार्थ्यांची प्रवृत्तीवरुन मूल्यमापन करता येईल. | १२ | ११.३२% |

सारणी क्रमांक ५·१७ पुढे चालू ····

| अ·नं· | मूल्यांचे मूल्यमापन करण्याचे मार्ग | प्रतिसादक संख्या | प्रतिसादाचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ६· | मुलांना त्यांनी रोजकेलेल्या कामाची नोंद (दैनंदिनी) करावयास लावणे व त्याद्वारे मूल्यांचे मूल्यमापन करता येईल· | १० | ९·४३% |
| ७· | पाठ्यपुस्तकातील घटकांवर, पाठांवर कृतीपुस्तिका तयार करुन ती मुलांच्याकडून सोडवून घ्यावी· त्या द्वारे मूल्यांचे मूल्यमापन करता येईल· | ८ | ७·५५% |
| | एकूण ·· | १८४ | |

टीप : प्रश्नावलींना प्रतिसाद देणा-या शिक्षकांपैकी कांही जणांनी एकाहून अधिक मार्ग सुचविल्यामुळे प्रतिसादक संख्येची बेरीज १०६ हून अधिक आलेली आहे·

सारणी क्रमांक ५·१७ मधील अनुक्रमांक १ मध्ये लेखी व मौखिक स्वरुपाची परीक्षा घेऊन म्हणजेच विद्यार्थ्यास विविध समस्यावरील व मूल्यांवरील प्रश्न विचारुन त्यांच्या येणा-या उत्तराच्या स्वरुपावरुन मूल्यमापन करता येईल असे प्रतिपादन १०६ प्रतिसादकांपैकी ६२ प्रतिसादकांनी ( ५८·४९% ) केलेले आहे·

प्रतिसादकांचे वरील मत कांही अंशी ग्राहय वाटते· कारण विविध त-हेचे मूल्यांवर आधारित प्रश्न विद्यार्थ्यांना विचारुन तो त्यांना कसा प्रतिसाद देतो यावरुन त्या विद्यार्थ्यात मूल्ये कितपत बौध्दिकदृष्टया ग्रहण केली आहेत हे सांगता येणे शक्य आहे· परंतु भावनिक व क्रियात्मक पातळीवरील मूल्यांचे प्रश्नाच्या साहयाने मूल्यमापन करणे अशक्य आहे· त्यामुळे प्रश्नाच्या सहाय्याने

सर्व त-हेच्या मूल्यांचे १००% मूल्यमापन अचूक होईलच असे नाही. परंतु मूल्यांचे मूल्यमापन करण्यासाठी विविध त-हेचे प्रश्न हा एक मार्ग आहे हे म्हणणे मान्य करावे लागते.

अनुक्रमांक २ मध्ये विद्यार्थ्यांचे विविध प्रसंगातील वर्तनावरून त्यांचे निरीक्षण करून मूल्यांचे मूल्यमापन करता येईल असे प्रतिपादन १०६ प्रतिसादकांपैकी ५२ प्रतिसादकांनी(४९.०५ %) केलेले आहे.

प्रतिसादकांचे वरील मत संयुक्तिक आहे. कारण प्रत्यक्ष प्रसंगामध्ये व्यक्ती कशी वागते हे महत्वाचे असते. कित्येक व्यक्ती बाबत प्रत्यक्ष बोलणे व वागणे यामध्ये भरपूर अंतर असते. त्यामुळे विद्यार्थ्यांवर जेव्हा जाणीवपूर्वक कांही संस्कार केले जातात, मूल्ये त्यांच्यामध्ये संक्रमित व्हावीत म्हणून प्रयत्न केले जातात अशावेळी केलेले प्रयत्न, संस्कार विद्यार्थ्यांनी कितपत आत्मसात केले आहेत १ याचा पडताळा तो विद्यार्थी प्रत्यक्ष प्रसंगात कसा वागतो म्हणजेच त्याच्या आचार व विचार यामध्ये एकवाक्यता आहे का हे प्रसंगाचे निरीक्षण केल्यानेच आपणास समजू शकते. म्हणून विद्यार्थ्यामध्ये रुजलेल्या मूल्यांचे मूल्यमापन करण्यासाठी त्यांच्या वर्तनातील प्रसंगाचे निरीक्षण करणे आवश्यक आहे हे प्रतिसादकाचे मत ग्राहय वाटते.

अनुक्रमांक ३ मध्ये विद्यार्थ्यांचे व्यवहारातील वर्तन म्हणजेच आपले सहकारी, समाजातील विविध व्यक्ती यांच्याशी तो कसा वागतो यावरून त्याच्यामध्ये असलेल्या मूल्यांचे मूल्यमापन करता येईल असे मत १०६ प्रतिसादकांपैकी २० प्रतिसादकांनी (१८.८७%) प्रतिपादन केलेले आहे.

अनुक्रमांक २ मध्ये यातील वर्तनाचा कांही भाग चर्चिला आहे. तरी सुद्धा विद्यार्थ्यांचे थोर व्यक्ती, वडीलधारी माणसे, त्यांच्या बरोबरीचे त्यांचे सहकारी यांच्याशी तो कसा वर्तन करतो त्याच्यापेक्षा लहानांशी तो कसा वागतो. यांचे निरीक्षण करून त्यांच्या मधील मूल्यांचे मूल्यमापन करता येते. हे प्रतिसादकांचे मत ग्राहय आहे.

अनुक्रमांक ४ मध्ये वेगवेगळ्या कार्यक्रमांचे शाळेमध्ये आयोजन करून त्यांची जबाबदारी विद्यार्थ्यांवर टाकून ती पार पाडण्याची त्यांची कुवत व कार्यपध्दती यांच्यावरून त्यांच्या ठिकाणच्या मूल्यांचे मूल्यमापन करता येईल. असा १०६ प्रतिसादकांपैकी २० प्रतिसादकांनी (१८.८७%) प्रतिसाद दिलेला आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकासासाठी शाळेमध्ये अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवावे लागतात. त्या कार्यक्रमांची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्यांवरच सोपवल्याने त्यांच्या अंगच्या विविध गुणांची परीक्षा करता येते. शिवाय असे कार्यक्रम विविध मुलांच्या सहकार्याने त्याला पार पाडावे लागतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अंगच्या विविध गुणांची पारख करता येते म्हणजेच विद्यार्थ्यांमध्ये जाणीवपूर्वक संक्रमित केलेल्या, त्याने आत्मसात केलेल्या विविध मूल्यांची पारख आपण करू शकतो. तथापि हे संशोधन इयत्ता १ ते ४ या इयत्तांमधील विद्यार्थ्यां-पुरते मर्यादित आहे हे लक्षात घेता या इयत्तांमधील विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये किती प्रमाणात संक्रमित झाली आहेत हे पाहण्यासाठी या मार्गाचा अवलंब करता येईल असे वाटत नाही.

अनुक्रमांक ५ मध्ये विद्यार्थ्यांचा अध्ययनातील सहभाग आजमावून म्हणजेच कोणतीही गोष्ट आत्मसात करण्याची विद्यार्थ्यांची प्रवृत्ती वरून मूल्यमापन करता येईल असा प्रतिसाद १०६ प्रतिसादकांपैकी १२ प्रतिसादकांनी (११.३२%) दिलेला आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याची ग्रहण क्षमता ही वेगवेगळी असते. त्यामुळे एकवेळ समजावून दिलेला भाग, मुद्दा विविध विद्यार्थ्यांना समानच कळेल असे नाही. याचाच अर्थ असा की प्रत्येकाची ग्रहण करण्याची क्षमता ही वेगवेगळी असते व या विचार ग्रहणक्षमतेच्या कुवतीवरच व्यक्तीचा बौध्दिक दर्जा ठरत असतो. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे जी गोष्ट उत्तम त-हेने आकलन होते, ग्रहण होते ती दीर्घकाल स्मरणात राहते; त्यामुळे मूल्यांचे ग्रहण विद्यार्थ्याकडून किती प्रमाणात व कसे झाले आहे, म्हणजेच त्यांचे आकलन त्यांना कितपत झाले आहे यावरच

त्यांच्यामध्ये ती कितपत रुजली आहेत हे ठरवता येईल.

त्यामुळे प्रतिसादकांनी दिलेला हा प्रतिसाद कांही अंशी मान्य करावा लागतो. कारण आपण त्यांची ग्रहणक्षमता आजमावतो पण प्रत्यक्ष मूल्य-मापन करतांना केवळ ग्रहणाची एकच कसोटी लावून १००% मूल्यमापन करता येणार नाही.

अनुक्रमांक ६ मध्ये विद्यार्थ्यांना त्यांनी केलेल्या रोजच्या कामाची नोंद करावयास लावणे व त्याद्वारे मूल्यमापन करता येईल असे प्रतिपादन १०६ प्रतिसाद-कांपैकी १० प्रतिसादकांनी (९.४३%) केलेले आहे.

विद्यार्थ्यांना दैनंदिन नोंदी करावयाची सवय लावल्याने त्यांनी आपले जीवनप्रसंग त्यांचे वर्तन यांच्या नोंदी केल्याने ते कसे वागतात ? कोणत्या त-हेने जीवन जगतात याची सविस्तर माहिती त्यांच्या या दैनंदिनीतून होऊ शकते. त्यामुळे जीवनात ते आचरणात आणत असलेली मूल्ये त्यांच्या दैनंदिन वर्तनातून प्रतिबिंबित होतात. त्यामुळे अशा मूल्यांचे मूल्यमापन करणे शक्य आहे. परंतु अशात-हेचे मूल्यमापन यथार्थ होण्यासाठी ते ज्यावरुन करावयाचे ती दैनंदिनी प्रामाणिकपणे लिहिली जाणे अत्यंत आवश्यक आहे. ही दैनंदिनी प्रामाणिकपणे लिहिली नसल्यास तिच्या आधारे केलेले मूल्यमापन चुकीचे ठरेल. तसेच प्रस्तुत संशोधन१ते ४ इयत्तांसाठी असल्यामुळे या इयत्तांमधील मुले दैनंदिनी लिहू शकतील असे वाटत नाही. सबब हा मार्ग चांगला असला तरी या इयत्तांतील मुलांसाठी अवलंब करण्यास योग्य आहे असे वाटत नाही.

अनुक्रमांक ७ मध्ये पाठ्यपुस्तकातील घटकावर, पाठावर कृतिपुस्तिका तयार करुन ती मुलांच्याकडून सोडवून घ्यावी व त्याद्वारे मूल्यांचे मूल्यमापन करता येईल असे प्रतिपादन १०६ प्रतिसादकांपैकी ८ प्रतिसादकांनी (७.५५%) केलेले आहे.

पाठ्यपुस्तकातील पाठांचे अध्यापन करतांना त्यामधील मूल्यांचे जाणीव-पूर्वक संस्कार विद्यार्थ्यांवर केल्यावर त्यावर आधारित कृतिपुस्तिका सोडवून घेतल्या

तर त्याच्यामध्ये कोणती मूल्ये संक्रमित झालेली आहेत ? किती प्रमाणात झालेली आहेत ? इत्यादी बाबी कृतिपुस्तिकेतील मिळणाऱ्या प्रतिसादावरून सांगू शकतो. परंतु कृतिपुस्तिकेला दिलेला प्रतिसाद हा प्रश्नांना दिलेल्या प्रतिसादाप्रमाणेच असल्याने प्रत्यक्ष वर्तन व त्याने दिलेले उत्तर यामध्ये तफावत असू शकते हे लक्षात ठेवावे लागेल.

## ५.९ प्रस्तुत संशोधनासंबंधी अन्य उपयुक्त माहिती :

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात प्रश्नावलीमध्ये विचारण्यात न आलेली परंतु प्रस्तुत संशोधनास उपयुक्त ठरेल अशी कांही माहिती ज्या प्रतिसादकांना द्यावयाची असेल अशा प्रतिसादकांच्या साठी प्रश्नावली मधील प्रश्न क्रमांक २६ ची " प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात वर विचारण्यात न आलेली तथापि प्रस्तुत संशोधनास उपयुक्त ठरेल अशी कांही माहिती द्यावयाची असल्यास ती खाली द्यावी." या प्रश्नाची योजना केली होती.

सदर प्रश्नक्रमांकाला १०६ प्रतिसादकापैकी एकाही प्रतिसादकाने प्रतिसाद दिलेला नाही.

## ५.१० समारोप :

प्रस्तुत प्रकरणात अध्यापकांना दिलेल्या प्रश्नावलीला मिळालेल्या प्रतिसादांचे वर्गीकरण व विश्लेषण करून अर्थनिर्वचन केले आहे.

हे वर्गीकरण, विश्लेषण व अन्वयार्थ पुढील मुद्दयांच्या संदर्भात केलेले आहे.

(१) अध्यापकांची सर्वसाधारण माहिती.

(२) पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये आणि त्यांचे संक्रमण.

(३) मूल्य व अभ्यासपूरक अभ्यासेतर उपक्रम.

(४) मूल्यसंदर्भात अध्यापकांचे प्रशिक्षण

(५) मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन.

(६) प्रस्तुत संशोधनास उपयुक्त अन्य माहिती.

पुढील प्रकरणात - प्रकरण ६ - या प्रकरणात निष्कर्ष आणि शिफारशी, लावलेल्या अन्वयार्थांच्या आधारे निष्कर्ष काढून प्रस्तुत प्रकरणात शिफारशी केलेल्या आहेत.

=0=0=0=0=0=